cmyk

## संपादकीय

### प्रश्न कर्मचाऱ्यांच्या सोयीचा नाही, तर जनतेच्या अधिकाराचा !

मुंबई महानगर क्षेत्रातील सरकारी महिला कर्मचाऱ्यांसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी नुकतीच 'कम अर्ली, गो अर्ली' अर्थात कार्यालयात लवकर या आणि लवकर घरी निघा ही संकल्पना जाहीर केली. मुंबईतील उपनगरी रेल्वेचा जीवघेणा प्रवास करत दैनंदिन कौटुंबिक जबाबदार्यादेखील सांभाळण्याची जीवघेणी कसरत करणाऱ्या भगिनीवर्गासाठी ही ३० मिनिटांची सवलत नक्कीच दिलासादायक आहे.

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–३१६ शनिवार दि.१४ मार्च २०२६ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

# ९.३२ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १८,६४० कोटी जमा

## पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा २२ वा हप्ता वितरित

**गुवाहाटी । प्रतिनिधी**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि.१३ मार्च) पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा २२ वा हप्ता वितरित केला. पंतप्रधान मोदी यांनी आसामच्या गुवाहाटी येथून देशातील ९.३२ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १८,६४० कोटी रुपये जमा केले. यामुळे गेल्या काही दिवसांपासून २ हजार रुपयांच्या हप्त्याची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पंतप्रधान मोदी यांनी यावेळी सुमारे १९,४८० कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांचेही उद्घाटन करत ते राष्ट्राला समर्पित केले.**



### ई– केवायसी बंधनकारक

पीएम किसान योजनेअंतर्गत नोंदणीकृत सर्व शेतकऱ्यांना ई– केवायसी बंधनकारक आहे. या योजनेच्या संकेतस्थळावरील माहितीनुसार, पीएम किसान पोर्टलवर ओटीपी आधारित ही प्रक्रिया सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. तसेच बायोमेट्रिक ई–केवायसी करण्यासाठी जवळच्या सीएससी केंद्रात जावे लागेल.

या योजनेअंतर्गत आतापर्यंत ४ लाख ९ हजार कोटी रुपयांहून अधिक अर्थसाह्य शेतकऱ्यांना देण्यात आले आहे. आता या योजेनचा २२वा हप्ता जारी झाल्यामुळे एकूण वितरित करण्यात आलेली रक्कम ४ लाख २७ हजार कोटी रुपयांहून अधिक झाली आहे. ज्या पात्र शेतकऱ्यांनी ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण केली असेल आणि या योजनेसाठी लागणारी सर्व आवश्यक कागदपत्रे वेळेवर सादर केली असतील, तर त्यांना हा २ हजार रुपयांचा हप्ता मिळणार आहे. या योजनेअंतर्गत, अर्थसाह्य थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये हस्तांतरित केले जाते. ▶▶ पान २ वर

# ॲट्रोसिटी कायद्यात आता थेट अटक नाही

## चौकशीनंतरच होणार कारवाई, मंत्री संजय शिरसाट यांची विधानपरिषदेत माहिती






**मुंबई । प्रतिनिधी**

ॲट्रोसिटी कायद्याचा पूर्वी गैरवापर होत असे, त्यामुळे या कायद्यात महत्त्वाचे बदल करण्यात आले असून, आता एफआयआर दाखल झाल्यावर तातडीने अटक न करता आधी समितीमार्फत चौकशी होईल आणि गुन्हा सिद्ध झाला तरच अटक केली जाईल, अशी माहिती सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना (शिंदे गट) नेते संजय शिरसाट यांनी विधानपरिषदेत दिली. कोणावरही विनाकारण अन्याय होऊ नये, हा या बदलामागील उद्देश असल्याचे ▶▶ पान २ वर

### खोट्या तक्रारींवरही कारवाईचा विचार

शिरसाट पुढे म्हणाले की, अन्याय झाला असेल तर गुन्हा दाखल झालाच पाहिजे. मात्र खोट्या तक्रारी करणाऱ्यांवरही कायद्यात काही तरतूद करता येईल का, याचाही शासन विचार करेल. तातडीने अटक करण्याची जी पद्धत होती ती आता थांबवण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय खोट्या तक्रारींवरही कारवाईचा करण्याचा विचार असल्याचे ते म्हणाले.

# स्व.देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी जयराम चाटे गावात

## चौदा महिन्यानंतर आणलेल्या आरोपीला १० कमांडोंचे संरक्षण

**बीड । प्रतिनिधी**

**तब्बल १४ महिन्यांपासून कोठडीत असलेला आणि मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील संशयित आरोपी जयराम चाटे शुक्रवारी पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला. निमित्त होते त्याच्या दिवंगत धाकट्या भावाच्या उत्तरकार्याचे (तेरवी). पण, हा केवळ घरचा विधी नव्हता, तर एखाद्या चित्रपटातील प्रसंगाप्रमाणे कडक बंदोबस्त आणि हायव्होल्टेज ड्रामा तांबव्याने अनुभवला.**



गावात तणाव निर्माण होऊ नये आणि सुरक्षेचे कोणतेही नियम पायदळी तुडवले जाऊ नयेत, यासाठी पोलिसांनी मोठा मास्टरप्लॅन आखला होता. मस्साजोगचा मुख्य मार्ग जाणीवपूर्वक टाळत पोलिसांनी धारूरमार्गे जयरामला गुपचूप तांबव्यात आणले. साधेसुधे पोलीस नाही, तर चक्क १० सशस्त्र कमांडोंच्या कडक पहाऱ्यात त्याला बीडहून आणण्यात आले. पोलिसांनी घराभोवती असा वेढा टाकला होता की, कोणीही फोटो किंवा व्हिडिओ काढू शकणार नाही. या मिशन तांबवामध्ये पोलिसांनी नियमांची इतकी कडक अंमलबजावणी केली की, ज्यांनी छुप्या पद्धतीने फोटो काढण्याचा प्रयत्न केला, त्यांचे मोबाईल तातडीने जप्त करण्यात आले. ▶▶ पान २ वर

## औद्योगिक गॅसपुरवठ्यात देशभर २० टक्के कपात

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**युद्धकालीन आणि काटकसरीचा उपाय म्हणून देशभरातील औद्योगिक तथा उत्पादन क्षेत्रातील ग्राहकांच्या गॅसपुरवठ्यात २० टक्के कपात करण्यात आली असून, खत कारखान्यांनाही ३० टक्के गॅस कपातीला सामोरे जावे लागत आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायुमंत्री हरदीपसिंह पुरी यांनी गुरुवारी लोकसभेत खास निवेदन करून ही माहिती दिली.**

मंत्री हरदीपसिंह पुरी म्हणाले, नैसर्गिक वायू नियंत्रण आदेश जारी करून ▶▶ पान २ वर

# नियम व अटी पूर्ण केल्यासच गुंठेवारी

## मंत्री उदय सामंत यांची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

**गुंठेवारी नियमितीकरणासाठी शासनाने ठरवून दिलेल्या नियम व अटींची पूर्तता करणे आवश्यक असून, संबंधित निकष पूर्ण करणाऱ्या प्रस्तावांनाच मंजुरी दिली जाते. आवश्यक कागदपत्रे व तांत्रिक अटी पूर्ण न झाल्यास संबंधित प्रस्ताव नाकारले जातात. त्यामुळे गुंठेवारी विकास नियमित करण्यासाठी सर्व निकषांची पूर्तता करणे गरजेचे असल्याचे मंत्री डॉ. उदय सामंत यांनी विधान परिषदेत सांगितले.**

नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चेत सदस्य योगेश टिळेकर यांनी याबाबत सूचना उपस्थित केली होती. यावेळी चर्चेत सदस्य प्रविण दरेकर यांनी सहभाग घेतला. मंत्री डॉ. उदय सामंत म्हणाले, राज्य शासनाने ३० एप्रिल २००१ पासून संपूर्ण महाराष्ट्रात गुंठेवारी विकास नियमितीकरणाचा अधिनियम लागू केला असून त्यानुसार पुणे महानगरपालिकेने शहर सुधारणा समितीमार्फत ▶▶ पान २ वर

## राज्यात पुढील ४ दिवसांत वादळी पावसासह गारपिटीचा इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील काही भागांमध्ये १७ ते २० मार्च दरम्यान मेघगर्जनेसह पाऊस, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हा परिणाम प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये जाणवू शकतो. १८ ते २० मार्च दरम्यान परिस्थिती अधिक तीव्र होण्याची शक्यता असून काही ठिकाणी गारपीट होण्याचीही शक्यता आहे.

हवामानाच्या अद्ययावत अंदाजावर लक्ष ठेवून शेतीच्या कामांचे नियोजन करावे आणि संभाव्य पाऊस व वादळी वाऱ्यांपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले ▶▶ पान २ वर

# देशातील गॅस संकटावरून लोकसभेत विरोधकांचा हल्लाबोल

## मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्यासाठी दोन्ही सभागृहात नोटीस

**दिल्ली । प्रतिनिधी**

लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू होताच विरोधकांनी गोंधळ घातला. राहुल गांधींसह विरोधी पक्षाच्या खासदारांनी आठ निलंबित खासदारांना पुन्हा संसदेत येऊ देण्याची मागणी केली. सभापती ओम बिर्ला यांनी उत्तर दिले, ''जर तुम्ही सभागृहात टेबलांवर चढलात तर हीच तुमची कारवाई असेल. संसदेची प्रतिष्ठा राखण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे.'' त्यानंतर लोकसभा प्रथम दुपारी १२ वाजेपर्यंत आणि नंतर पुन्हा २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात ▶▶ पान २ वर

# पंतप्रधान मोदींना मित्र राष्ट्रांना नाराज करायचे नाही!

## मौन बाळगल्याबद्दल काँग्रेसची खोचक टीका

**दिल्ली । वृत्तसंस्था**



इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येबाबत बाळगलेल्या मौनावरून काँग्रेसने शुक्रवारी मोदी सरकारवर जोरदार टीका केली. तसेच, पंतप्रधान आपल्या अमेरिकन आणि इस्रायली ▶▶ पान २ वर

# गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी राज्यभर नियंत्रण कक्ष

## जिल्हास्तरीय समित्या स्थापन

**मुंबई । प्रतिनिधी**

**इराण – इस्राईल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठ्याबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.**




संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत

ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत. घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या ▶▶ पान २ वर

### पर्याय शोधण्यास सुरूवात...

पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्देशही यंत्रणांना देण्यात आले आहेत. यामध्ये कोळसा, रॉकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच जिल्हास्तरीय समित्यांनी हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांसोबत बैठक घेऊन पर्यायी इंधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहेत.

### अत्यावश्यक सेवांना प्राधान्याने पुरवठा

रुग्णालये, शासकीय वसतिगृहे, शासकीय शाळा/महाविद्यालयांमधील मेस, मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा आदी अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्थांना घरगुती/व्यावसायिक गॅसचा पुरवठा प्राधान्याने देण्यात येणार असून अशा संस्थांची यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने देण्यासाठी स्वतंत्र प्राधान्यक्रमही निश्चित केला जाणार आहे. गॅस पुरवठ्याबाबत अफवा पसरू नयेत, यासाठी दररोज रेडिओ, एफएम, दूरदर्शन तसेच मुद्रित माध्यमांद्वारे माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही

महाराष्ट्र राज्यात दररोज सरासरी सुमारे ९,००० मेट्रिक टन एलपीजी ची मागणी असते. ही मागणी पूर्ण करण्यासाठी रिफायनरीमधील एलपीजी उत्पादन वाढविण्यात आले असून, गेल्या दोन दिवसांत दैनिक उत्पादन ९,००० मेट्रिक टनांवरून ११,००० मेट्रिक टनांपर्यंत वाढविण्यात आले आहे. त्यामुळे राज्यात घरगुती एलपीजीचा कोणताही तुटवडा नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. घरगुती गॅसची मागणी पूर्ण करण्याइतके पुरेसे उत्पादन आणि साठा उपलब्ध आहे.

## थोडक्यात...

### पाकिस्तानच्या एअर स्ट्राईकने कंदाहार हादरले

कराची: अमेरिका–इस्रायल आणि इराणमधील युद्धामुळे जगभरात चिंतेचे वातावरण असतानाच आपल्या शेजारील राष्ट्र असलेल्या पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील तणाव पुन्हा वाढला आहे. कारण पाकिस्तानने अफगाणिस्तानमधील विविध ठिकाणी हवाई हल्ले केले असून, या हल्लात चौघांचा मृत्यू तर १५ जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. पाकिस्तानने कंदाहार विमानतळाजवळील खासगी विमान कंपनीच्या तेल साठ्यावर बॉम्ब हल्ला केल्याचा आरोप तालिबान सरकारने केला आहे. दरम्यान, पाकिस्तानी लष्कराने तहरीक–ए–तालिबान पाकिस्तान या संघटनेच्या तळाला अचूक लक्ष्य केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अफगाणिस्तान तहरीक–ए–तालिबानच्या दहशतवाद्यांना आसरा देत असल्याचा आरोप पाकिस्तानकडून करण्यात येतो. मात्र, अफगाणिस्तानने हे दावे फेटाळत अफगाणिस्तानच्या जमिनीचा वापर दुस–या देशावर हल्ले करण्यासाठी केला जात नसल्याचे स्पष्ट केले आहे.

### राष्ट्रपती भवनात खासदारांना निमंत्रण

नवी दिल्ली : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शुक्रवारी राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात महाराष्ट्रासह विविध राज्यांतील खासदारांना अल्पोपहारासाठी निमंत्रित केले होते. यामध्ये महाराष्ट्र राज्यासह उत्तराखंड, चंदीगड, लडाख, गुजरात, मध्य प्रदेश आणि दिल्ली येथील खासदार आणि राज्यसभेतील नामनिर्देशित सदस्य उपस्थित होते. राष्ट्रपती भवनात आयोजित या कार्यक्रमात अल्पोपहारासह भारतीय नेव्हीच्या बँडचे अतिशय सुंदर सांगीतिक सादरीकरण होते. या सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विशेष म्हणजे यावेळी काही मराठी गाण्यांचे मधुर संगीत देखील ऐकता आले. यामध्ये सैराट चित्रपटातील ''याड लागलं गं'' या गाण्याने अनेकांना आकर्षित केले. या अनौपचारिक कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी खासदारांनी संवाद साधला. यानिमित्त विविध राज्यांतील खासदारांना एकत्र येता आले आणि त्यांनाही एकमेकांशी संवाद साधता आला.

### ई–रिक्षा व ई–बाइकसाठीही परवाना बंधनकारक

मुंबईः प्रवासी वाहतूक करणाऱ्या ई–रिक्षा व ई–बाइकना यापुढे मोटार वाहन विभागाकडे रितसर नोंदणी करुन परवाना घेणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. सरनाईक म्हणाले की, आतापर्यंत इलेक्ट्रिक रिक्षांना (ई–रिक्षा) प्रवासी वाहतुकीसाठी स्वतंत्र परमिट घेण्याची सक्ती नव्हती. मात्र, वाढत्या ई–वाहनांच्या संख्येचा विचार करता प्रवासी वाहतुकीत एकसमान नियम लागू करण्यासाठी ई–रिक्षा व ई–बाइक साठीही परवाना प्रक्रिया बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. या निर्णयामुळे पारंपरिक रिक्षा, टॅक्सी आणि इलेक्ट्रिक रिक्षा या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी समान नियम लागू राहतील. प्रवासी वाहतुकीच्या व्यवस्थेत पारदर्शकता वाढविणे आणि अनियमितता टाळणे हा यामागील उद्देश आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २२२.५० क्विंटल | २,००० | २,६९५ | २,२२४ |
| ज्वारी/हायब्रिड: १६५.५० क्विंटल | २,००० | ४,७०१ | ३,४०३ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : २०.०० क्विंटल | ७,१०० | ७,६५१ | ७,४६६ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: २२.०० क्विंटल | २,४१० | ३,०७० | २,७६५ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १.५० क्विंटल | ५,१५० | ५,१५० | ५,१५० |
| हरभरा: ३०.५० क्विंटल | ४,८०० | ५,१२५ | ४,९५८ |

cmyk

अग्रलेख

# प्रश्न कर्मचाऱ्यांच्या सोयीचा नाही, तर जनतेच्या अधिकाराचा !

मुंबई महानगर क्षेत्रातील सरकारी महिला कर्मचाऱ्यांसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी नुकतीच 'कम अर्ली, गो अर्ली' अर्थात कार्यालयात लवकर या आणि लवकर घरी निघा ही संकल्पना जाहीर केली. मुंबईतील उपनगरी रेल्वेचा जीवघेणा प्रवास करत दैनंदिन कौटुंबिक जबाबदार्यादेखील सांभाळण्याची जीवघेणी कसरत करणाऱ्या भगिनीवर्गासाठी ही ३० मिनिटांची सवलत नक्कीच दिलासादायक आहे. महानगरातील वाहतूक कोंडी, गर्दीची लोकल आणि घर-कार्यालय यामधील समतोल साधताना महिलांना भेडसावणाऱ्या अडचणी लक्षात घेता हा निर्णय मानवी संवेदनशीलतेचा दाखला देणारा आहे. मात्र या निर्णयाच्या निमित्ताने गेल्या सहा वर्षांपासून राज्यात लागू असलेल्या 'पाच दिवसांच्या आठवड्या'चा मूळ हेतू आणि त्याचे सर्वसामान्यांवर होणारे परिणाम यावर सखोल फेरविचार करण्याची वेळ आता आली आहे.

सरकारी तिजोरीतून पगार घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची सोय करताना, ज्यांच्या करातून हे पगार दिले जातात त्या सामान्य जनतेच्या हिताचा विचार कितपत केला जातो, हा कळीचा प्रश्न आहे. २९ फेब्रुवारी २०२० रोजी राज्यात पाच दिवसांचा आठवडा लागू झाला, तेव्हा त्यामागे एक उदात्त आणि लोकाभिमुख हेतू होता. कर्मचाऱ्यांना दोन दिवस विश्रांती मिळाल्यास त्यांचा ताण कमी होईल आणि उर्वरित पाच दिवसांत ते अधिक कार्यक्षमतेने काम करतील, अशी अपेक्षा होती. शनिवार-रविवारची सुट्टी भरून काढण्यासाठी कामाची वेळ ४५ मिनिटांनी वाढवून सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी करण्यात आली. प्रशासन अधिक कार्यक्षम होईल, फाइलांचा वेग वाढेल आणि नागरिकांना जलद सेवा मिळेल, अशी आशा व्यक्त करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्ष वास्तव वेगळेच चित्र दाखवते. अनेक शासकीय कार्यालयांत सकाळी साडेदहापर्यंत खुर्च्या रिकाम्याच दिसतात. वेळेवर उपस्थिती ही कागदोपत्री अट राहिली असून, तिचे काटेकोर पालन होताना दिसत नाही. शिपायांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत अनेक जण वेळेच्या शिस्तीबाबत उदासीन असल्याचे चित्र आहे. परिणामी नागरिकांच्या कामांचा विलंब होतो. गावोगावहून, दूरवरून आपली कामे घेऊन आलेला नागरिक सकाळी आठ-नऊ वाजल्यापासून कार्यालयाच्या पायऱ्यांवर थांबलेला असतो. काही वेळा दुपारपर्यंतही संबंधित अधिकारी उपलब्ध नसल्याचे अनुभव सर्वसामान्यांना येतात. 'सरकारी काम अन् सहा महिने थांब' ही म्हण आजही तितकीच लागू पडते. पाच दिवसांच्या आठवड्यामुळे वर्षातील जवळपास १०४ दिवस सुट्ट्यांमध्येच जातात. त्यात राष्ट्रीय, राज्यस्तरीय आणि इतर सार्वजनिक सुट्ट्यांची भर पडते. परिणामी वर्षातील साधारणतः एक तृतीयांश काळ शासकीय कार्यालये बंद असतात. एखादी सार्वजनिक सुट्टी गुरुवार किंवा मंगळवारी आली की त्याला जोडून 'लाँग विकेंड' तयार होतो आणि सलग तीन-चार दिवस कार्यालये बंद राहतात. या काळात अनेक कामे प्रलंबित राहतात. रेशनकार्ड, सातबारा, दाखले, परवाने, पेन्शन किंवा शासकीय योजनांशी संबंधित कामे यासाठी नागरिकांना पुन्हा-पुन्हा फेऱ्या माराव्या लागतात. प्रशासनाच्या या सुस्त गतीचा सर्वाधिक फटका ग्रामीण आणि गरीब घटकांनाच बसतो. कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी घेतलेल्या निर्णयामुळे जनतेच्या कामांचा खोळंबा होणे हे लोकशाही व्यवस्थेसाठी चिंतेचे लक्षण आहे. कारण सरकारी यंत्रणा ही जनतेच्या सेवेसाठी अस्तित्वात आहे. कर्मचाऱ्यांची सुविधा महत्त्वाची असली तरी जनतेची गरज त्याहून अधिक महत्त्वाची आहे. सरकारचा उद्देश जनतेला कार्यक्षम सेवा देणे हा असायला हवा. जर त्या सेवेतच अडथळे निर्माण होत असतील, तर त्या धोरणाचा पुनर्विचार करणे आवश्यक ठरते. जगभरातही पाच दिवसांच्या आठवड्याबाबत चर्चा सुरू आहे. काही देशांनी प्रयोग म्हणून चार दिवसांचा आठवडा सुरू केला आहे, परंतु त्या ठिकाणी उत्पादकता, डिजिटल ट्रॅकिंग आणि कार्यक्षमतेची कठोर मोजणी केली जाते. कर्मचाऱ्यांची उपस्थिती, कामाचा वेग आणि निकाल यांचे काटेकोर मूल्यमापन केले जाते. त्यामुळे कमी दिवसांतही अधिक काम पूर्ण होते. परंतु भारतात, विशेषतः सरकारी यंत्रणेत, अजूनही पारंपरिक कामकाजाची पद्धत प्रचलित आहे. 'हजेरी लावून गायब होणे' किंवा काम पुढे ढकलणे ही संस्कृती संपलेली नाही. त्यामुळे पाच दिवसांचा आठवडा अनेकदा 'पगारी सुट्टी'सारखा वाटू लागतो. काही राज्यांमध्ये या विषयावर पुनर्विचार सुरू झाला आहे. प्रशासनावर वाढणारा कामाचा ताण आणि नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेता काही ठिकाणी सहा दिवसांच्या आठवड्याची मागणी होत आहे. याचा अर्थ असा नाही की कर्मचाऱ्यांवर अन्याय करावा; पण सेवा आणि सुविधा यामध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांना दिलेल्या सवलतींचा परिणाम जनतेवर नकारात्मक होणार नाही याची खबरदारी घेणे ही सरकारची जबाबदारी आहे. 'कम अर्ली, गो अर्ली'सारख्या निर्णयामागील संवेदनशीलता नाकारता येणार नाही. विशेषतः महिलांसाठी तो सकारात्मक पाऊल आहे. घर, मुलं, वृद्धांची काळजी आणि कार्यालयीन जबाबदाऱ्या सांभाळताना महिलांवर प्रचंड ताण येतो. त्यामुळे त्यांना दिलेली ही छोटीशी सवलत निश्चितच स्वागतार्ह आहे. परंतु याच वेळी प्रशासनातील कामकाजाची शिस्त आणि जबाबदारी यांचाही तितकाच विचार होणे गरजेचे आहे. आज गरज आहे ती प्रशासनाच्या आत्मपरीक्षणाची. पाच दिवसांचा आठवडा लागू करताना ज्या अपेक्षा व्यक्त केल्या गेल्या होत्या, त्या कितपत पूर्ण झाल्या याचा वस्तुनिष्ठ आढावा सरकारने घ्यायला हवा. कामाचा वेग वाढला का? नागरिकांच्या तक्रारी कमी झाल्या का? सरकारी सेवांचा दर्जा सुधारला का? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे मिळणे आवश्यक आहे. जर उत्तर नकारात्मक असेल, तर धोरणात बदल करण्याचे धाडस सरकारने दाखवायला हवे. शेवटी प्रश्न हा कर्मचाऱ्यांच्या सोयीचा नाही, तर जनतेच्या अधिकाराचा आहे. जनतेच्या करातून चालणारी ही यंत्रणा जनतेलाच वेळेवर सेवा देण्यात अपयशी ठरत असेल, तर त्याचा पुनर्विचार होणे अपरिहार्य आहे. सरकारने सहा वर्षांचा लेखाजोखा जनतेसमोर मांडावा आणि आवश्यक ते कठोर निर्णय घ्यावेत. कारण प्रशासनाचे अंतिम ध्येय एकच असतेजनतेची सेवा. जर तीच सेवा उशिरा मिळत असेल, तर कोणतीही योजना कितीही आकर्षक असली तरी तिचे औचित्य प्रश्नांकित ठरते.

# वाळू माफियाकडून तलाठी सुनील उंबरहंडेवर हल्ला; ट्रॅक्टर पळवला

## आरोपींवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश

**अंबड । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आशिमा मित्तल , अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ आणि उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली, अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वात दि. १३ मार्च रोजी आपेगाव-साष्ट पिंपळगाव परिसरात अवैध गौण खनिज उत्खननाविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली. मात्र, ही कारवाई करत असताना वाळू माफियांनी महसूल पथकातील तलाठी सुनील उंबरहंडे यांच्यावर हल्ला करून कायदेशीररित्या ताब्यात घेतलेले ट्रॅक्टर बळजबरीने पळवून नेल्याची गंभीर घटना घडली आहे.**

तहसीलदार विजय चव्हाण यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, मोजे आपेगाव-साष्ट पिंपळगाव परिसरातून अवैध वाळूची वाहतूक सुरू आहे. या माहितीच्या आधारे तहसीलदार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तलाठी श्री. उंबरहंडे व त्यांच्या पथकाला तात्काळ कारवाईचे आदेश देण्यात आले. पथकाने घटनास्थळी धाव घेतली असता, करण संकुश घुले (रा. भांबेरी) हा ट्रॅक्टरमधून अवैध वाळू वाहतूक करताना आढळला. पथकाला पाहताच चालकाने ट्रॅक्टरमधील रेती खाली करून पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पथकाने पाठलाग करून भांबेरी शिवारामध्ये ट्रॅक्टर अडवून ते कायदेशीररित्या ताब्यात घेतले. सदर पथकाने ट्रॅक्टरचा नंबर व ट्रॅक्टर फोटो घेतले तसेच पळून जाताना व्हिडिओ घेतले आहे. तसेच तेथे उपस्थित असलेल्या काही व्यक्तीचे फोटो घेतले आहे... शासकीय पथकावर हल्ला आणि 'दरोडा': सदर ट्रॅक्टर तहसील कार्यालयात जमा करण्याचे निर्देश असताना,



आरोपी करण घुले याने त्याचे ७ ते ८ साथीदार घटनास्थळी बोलावून घेतले. या टोळक्याने पथकातील तलाठी व त्यांच्या सहकाऱ्यांना बळजबरीने पकडून ठेवत त्यांना धक्काबुक्की केली. ''ट्रॅक्टर सोडून द्या, अन्यथा जीवे मारू,'' अशी धमकी देत या माफियांनी शासकीय कर्मचाऱ्यांवर दबाव आणला. अत्यंत उद्दामपणे वागत, कायदेशीर प्रक्रियेनुसार ताब्यात घेतलेले ट्रॅक्टर या आरोपींनी बळाचा वापर करून पळवून नेले. शासकीय मालमत्ता अशा प्रकारे बळजबरीने हिसकावून नेणे, हा गंभीर स्वरूपाचा 'दरोडा' असून प्रशासकीय कामात अडथळा निर्माण करण्याचा हा प्रकार आहे. मोठ्या प्रमाणावर अवैध उत्खनन उघड या कारवाईदरम्यान पथकाने गोदावरी नदी पात्राची पाहणी केली असता, तिथे अंदाजे ५ ते ६ मीटर खोलीचे मोठे खड्डे आढळून आले. प्राथमिक अंदाजानुसार, आरोपींनी सुमारे २०० ते ३०० ब्रास रेतीचे अवैध उत्खनन केल्याचे निष्पन्न झाले असून, यामुळे पर्यावरणाची मोठी हानी व शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडाला आहे. कठोर कायदेशीर कारवाईचे आदेश या घटनेची गंभीर दखल घेत तहसीलदार विजय चव्हाण यांनी आरोपींवर खालील कलमान्वये गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत:

# विनयभंगाचा गुन्हा मागे घेण्यासाठी पिढीतेच्या घरावर दगडफेक !

## पेठ बीड पोलिसांवर आरोपींना पाठीशी घालण्याचा आरोप

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरात गुन्हेगारांचे मनोबल किती वाढले आहे याचे धक्कादायक उदाहरण समोर आले आहे. एका १४ वर्षीय मुलीच्या विनयभंगाच्या प्रकरणात दाखल असलेला गुन्हा मागे घेण्यासाठी आरोपींनी भरदिवसा पीडितेच्या घरात घुसून तुफान दगडफेक केली. या हल्ल्यात पीडितेची सासू आणि वहिनी जखमी झाल्या असून घराचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र या गंभीर घटनेनंतरही पेठ बीड पोलिसांनी केवळ एनसी (एनसीआर) दाखल केल्याने पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.**

बिलाल मस्जिद परिसरातील रहिवासी जमीला अस्लम शेख यांच्या १४ वर्षीय अल्फिया या मुलीची आरोपी इरफान उस्मान शेख याने १० ऑक्टोबर २०२५ रोजी छेड काढली होती. या घटनेप्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात जिल्हा न्यायालयाने आरोपीचा अटकपूर्व जामीन फेटाळला होता; मात्र सध्या तो उच्च न्यायालयाच्या अंतरिम जामिनावर बाहेर आहे. दरम्यान, हा गुन्हा मागे घेण्यासाठी आरोपींकडून पीडित कुटुंबाला सातत्याने धमक्या दिल्या जात असल्याचे समोर आले आहे. शुक्रवारी सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास सुरैय्या उस्मान शेख, हुसेन शेख, इरफान शेख आणि इमरान शेख या चौघांनी पीडितेच्या घरात घुसून ''केस मागे घे, नाहीतर जिवंत सोडणार नाही'' अशी धमकी देत घरावर मोठ्या प्रमाणावर दगडफेक केली. या हल्ल्यात एका महिलेच्या पायाला तर वहिनीच्या मांडीला गंभीर दुखापत झाली आहे. दगडफेकीमुळे घराचेही मोठे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे हा संपूर्ण प्रकार आरोपींच्या स्वतःच्या तसेच शेजारील सुलतान आणि युसुफ यांच्या घरावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. पुराव्यानिशी तक्रार देऊनही पोलिसांनी गंभीर कलमे लावून गुन्हा दाखल केला नसल्याचा आरोप पीडित कुटुंबाने केला आहे. पीडितेची आई जमीला शेख यांनी पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ''आम्ही तक्रार द्यायला गेलो असता आरोपींना वाळू माफियांचे संरक्षण असल्याने पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे एफआयआर नोंदवला नाही. उलट केवळ एनसी ( क्रमांक १२५/२०२६) दाखल करून आरोपींना पाठीशी घातले.'' पोलिसांच्या या भूमिकेमुळे पीडित कुटुंबाच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. घरात घुसून दगडफेक व धमकी देणाऱ्या आरोपींवर कठोर गुन्हा दाखल करावा. वाळू माफियांच्या दबावाखाली काम करणाऱ्या संबंधित पोलिसांची चौकशी करावी. संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांचा सीडीआर तपासून सत्य बाहेर आणावे. पीडित कुटुंबाला तात्काळ पोलीस संरक्षण द्यावे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करताना त्या परिसरात असलेल्या अनेक ठिकाणची सीसीटीव्ही फुटेज तपासावेत आणि ते तपासात नमूद करावेत अशी मागणी करण्यात येत आहे. सीसीटीव्ही फुटेज मध्ये कोणी कोणावर हल्ला केला आणि कशा पद्धतीने घरावर दगडफेक केली आणि किती लोक होते हे स्पष्ट होईल. त्यामुळे पोलिसांनी कोणाच्याही दबावाला बळी न पडता सरळ सीसीटीव्ही फुटेज बघावेत आणि त्यानुसार तपास करावा अशी मागणी आता कुटुंबाकडून करण्यात आली आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त पांढरी येथे 'नारी सन्मान सोहळा' उत्साहात

**मादळमोही । प्रतिनिधी**

**८ मार्च रोजी जागतिक महिला दिना निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांढरी ता, गेवराई येथे शाळेत महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात गावातील आणि परिसरातील अनेक महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला.राष्ट्रमाता जिजाऊ आणि विद्येची माऊली सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक श्री विष्णू आडे यांनी सांगितले की, ८ मार्च रोजी हा दिवस संपूर्ण जगभर महिलांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेण्यासाठी साजरा केला जातो.**

महिला ही कुटुंबाची, समाजाची आणि देशाच्या प्रगतीची आधारस्तंभ आहे. आई, बहीण, पत्नी, मुलगी अशा अनेक भूमिका निभावत महिला समाजात महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असतात. आज महिलांनी शिक्षण, विज्ञान, राजकारण, क्रीडा आणि उद्योग अशा सर्व क्षेत्रांत मोठे यश मिळवले आहे. आपल्या भारत देशातही अनेक महान महिलांनी समाजासाठी मोठे कार्य केले आहे. राजमाता जिजाऊ यांच्या स्वप्नातून प्रत्यक्षात हिंदवी स्वराज्य उभे राहिले. सावित्रीबाई फुले यांनी



महिलांच्या शिक्षणासाठी मोठे योगदान दिले. आदर्श शासक म्हणून अहिल्याबाई होळकर यांनी कार्य केले. तसेच कल्पना चावला यांनी अंतराळात जाऊन भारताचे नाव उज्ज्वल केले. आजच्या काळात महिला स्वावलंबी होत आहेत. महिला बचतगट, शिक्षण, व्यवसाय आणि विविध क्षेत्रांमध्ये त्या पुढे जात आहेत. म्हणूनच आपण सर्वांनी महिलांचा आदर करणे, त्यांना समान संधी देणे आणि त्यांच्या प्रगतीला पाठिंबा देणे हे आपले कर्तव्य आहे. ''स्त्री ही शक्ती आहे, स्त्री ही प्रेरणा आहे आणि स्त्रीशिवाय समाजाची प्रगती अशक्य आहे.'' असे प्रतिपादन केले. मेळाव्यात महिलांच्या सक्षमीकरणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच महिला बचतगटांच्या कार्याचा गौरव करून त्यांना सन्मानपत्र देण्यात आले. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, गीत, नृत्य आणि भाषणांमुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमांमध्ये फुग्यांचा खेळ, संगीत खुर्ची आणि महिलांचा आवडते हळदी कुंकू, आणि उखाणे घेण्यात आले. स्पर्धकांना बक्षीस देण्यात आले तर गावातील महिला बचत गटांना ''नारी सन्मान प्रमाणपत्र'' देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. गावातील प्रत्येक मूल गावातील शाळेतच जाईल हा निश्चय महिलांनी केला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी महिलांनी शिक्षण, स्वावलंबन आणि सामाजिक कार्यात पुढे यावे असे आवाहन डॉ . रचना शेळके यांनी केले. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी महिलांनी पुढाकार घेऊन आदर्श शाळा बनवावी असे मत मांडण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती कोंडाबाई निकम, प्रमुख अतिथी म्हणून डॉक्टर अजहर शेख, डॉक्टर रचना शेळके, कांता जाधव आरोग्यसेविका, सौ अरुणा विष्णू आडे , सौ रेखा काळे तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री आशिष फुलझळके यांनी केले. आभार श्री शहादेव काळे यांनी सर्व महिलांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष रामदास निकम उपाध्यक्ष गोकुळ इंगळे, आणि इतर सदस्य, तसेच माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष व सर्व सदस्य, अंगणवाडी ताई, मदतनीस, आशा सेविका, आणि महिला भगिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# पान १ वरून...

### ९.३२ कोटी शेतकऱ्यांच्या बँक

या अंतर्गत, पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी एकूण ६ हजार रुपये मिळतात. ही रक्कम दर चार महिन्यांनी २ हजार रुपयांच्या तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. ही रक्कम थेट लाभ हस्तांतरण द्वारे थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमी करण्यात येते.

-----------

### स्व.देशमुख हत्या प्रकरणातील

मकोका न्यायालयाच्या आदेशाने दुपारी साडेबारा दरम्यान जयराम घरात पोहोचला. पोलिसांनी त्याला आई, वडील, भाऊ आणि दोन बहिणींव्यतिरिक्त कोणाशीही बोलण्यास सक्त मनाई केली होती. दुपारी १:२२ वाजता विधी आटोपून त्याला पुन्हा पोलीस व्हॅनमध्ये बसवण्यात आले. १४ महिन्यांनंतर बाहेर आल्यावर गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती, ज्याला जयरामने गाडीतून हात उंचावून प्रतिसाद दिला.

---------------

### अ‍ॅट्रोसिटी कायद्यात

त्यांनी स्पष्ट केले. शिरसाट यांनी विधानपरिषदेत बोलताना सांगितले की, पूर्वी अ‍ॅट्रोसिटीचे गुन्हे सर्रासपणे दाखल केले जायचे. एखाद्याने शिवी दिली असे म्हणून जरी पोलीस ठाण्यात गेले तरी आरोपीवर अ‍ॅट्रोसिटीचा गुन्हा दाखल व्हायचा. गुन्हा दाखल झाल्यावर २४ तासांच्या आत अटक करण्याचा नियमही होता आणि त्यानुसार काही ठिकाणी अटकाही व्हायच्या. या कायद्याचा काही प्रमाणात गैरवापर झाल्याचे नाकारता येत नाही, हे शिरसाट यांनी मान्य केले. बदललेल्या कायद्यानुसार आता एफआयआर नोंदवता येईल, मात्र अटक करण्यापूर्वी तपास अधिकारी संपूर्ण खात्री करेल. चौकशीत गुन्हा चुकीचा आढळल्यास तपास अधिकारी कलम १६९ नुसार समरी देतो. त्यानंतर न्यायालयात प्रकरण आल्यावर ही समरी जोडली जाते आणि केस मागे घेतली जाते. थोडक्यात, गुन्हा सिद्ध झाला तरच अटक होईल, अन्यथा एफआयआर रद्द होतो, अशी नवी प्रक्रिया लागू करण्यात आली आहे.

----------

### राज्यात पुढील ४ दिवसांत

आहे. त्याचबरोबर सध्या रब्बी हंगामातील पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवावीत, असेही सांगण्यात आले आहे. राज्यातील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यांची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हा परिणाम प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये असेल.

-------------

### नियम व अटी पूर्ण केल्यासच

१२ फेब्रुवारी २०२१ रोजी ठराव करून गुंठेवारी विकास नियमित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यासंदर्भात आतापर्यंत ११३३ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ४० प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. ७३१ प्रस्ताव नाकारण्यात आले असून ३२७ प्रस्तावांवर सध्या कार्यवाही सुरू आहे. मंत्री उदय सामंत नाकारलेल्या प्रस्तावांमागे मोजणीचा नकाशा उपलब्ध नसणे, अपेक्षेपेक्षा जास्त अतिरिक्त बांधकाम झालेले असणे, केंद्रीय संरक्षण मंत्रालयाचे ना हरकत प्रमाणपत्र नसणे तसेच विमानतळाच्या फनेल झोनमध्ये बांधकाम झालेले असणे या कारणाचा समावेश आहे. या कारणांमुळे काही प्रस्तावांना मंजुरी देता आलेली नाही. फनेल झोनमधील घरांना आयकरामध्ये सवलत देण, घरांना परवानगी देण आणि संरक्षण मंत्रालयाची परवानगी मिळवण हे राज्य शासनाच्या अंतर्गत येत नाही. गुंठेवारी नियमित व्हावी याबाबत शासन सकारात्मक असले तरी कोणतेही शुल्क न घेता सर्व बांधकामे नियमित केल्यास महानगरपालिकेचा महसूल कमी होईल, असेही स्पष्ट केले.

---------------

### औद्योगिक गॅसपुरवठ्यात

गॅसपुरवठ्याचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आला. त्यानुसार घरगुती पाईप गॅस आणि वाहनांसाठी लागणारा सीएनजी यांच्या पुरवठ्यात कोणतीही कपात करण्यात आलेली नाही. हा पुरवठा १०० टक्के सुरू आहे. औद्योगिक आणि उत्पादन क्षेत्रातील ग्राहकांना मात्र गेल्या सहा महिन्यांतील इंधन वापराच्या सरासरीनुसार ८० टक्के गॅस पुरवण्यात येत आहे. पेरणी हंगामापूर्वी कृषी साहित्य साखळीचे संरक्षण करण्यासाठी खत कारखान्यांना ७० टक्के गॅस मिळेल. तेल शुद्धीकरण आणि पेट्रो केमिकल प्रकल्पांनाही सुनियोजित कपातीला सामोरे जावे लागत आहे.

-----------

### पंतप्रधान मोदींना मित्र राष्ट्रांना

मित्रांना नाराज करणे टाळू इच्छितात, यात शंका नाही, असेही काँग्रेसने म्हटले आहे. वास्तविक खामेनी यांच्या निधनानंतर केंद्र सरकारने चौथ्या दिवशी दुखवटा व्यक्त केला होता. काँग्रेसचे संपर्क विभागाचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले की, भारताने इराणने आखाती देशांवर केलेल्या हल्ल्यांचा योग्यच निषेध केला आहे; परंतु, मुळात अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांबाबत मात्र भारत पूर्णपणे गप्प आहे. इराणचे घटनात्मक राष्ट्रप्रमुख अयातुल्ला अली खामेनी यांची २८ फेब्रुवारी २०२६ रोजी अमेरिका आणि इस्रायलने हत्या केली याविषयी पंतप्रधान गप्प आहेत, देशाचे परराष्ट्र मंत्री गप्प आहेत. संसदेत अद्याप त्यांच्या निधनाबाबत शोकप्रस्तावही मांडला गेलेला नाही. हे लक्षात ठेवले पाहिजे की, इराण हा ब्रिक्स प्लस मंचाचा एक भाग आहे आणि या वर्षी या मंचाचे अध्यक्षपद भारताकडेच आहे, असेही रमेश यांनी नमूद केले. त्यामुळे हा दुखवटा वेळेवर प्रसिद्ध व्हायला हवा होता, असे काँग्रेसचे म्हणणे आहे. मे २०२४ मध्ये इराणचे राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रईसी यांचा एका रहस्यमय हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू झाला होता. त्या घटनेची आठवण करून देत रमेश म्हणाले की, त्यावेळी मोदी सरकारने २१ मे २०२४ रोजी एक दिवसाचा राष्ट्रीय शोक पाळण्याचे आदेश दिले होते आणि १ जुलै २०२४ रोजी जेव्हा संसदेचे अधिवेशन सुरू झाले, तेव्हा संसदेत त्यांच्या निधनाबाबत शोकप्रस्तावही मांडण्यात आला होता. मग आता हा संकोच का?

--------------

### देशातील गॅस संकटावरून लोकसभेत

आली. दुपारी २ वाजता सुरू झालेले कामकाज केवळ एक तास चालले. त्यानंतर लोकसभा १६ मार्चपर्यंत तहकूब करण्यात आली. या काळात विरोधकांनी गोंधळ घालत पंतप्रधान मोदींविरुद्ध घोषणाबाजी सुरूच ठेवली. यापूर्वी, विरोधी पक्षांनी संसदेच्या परिसरात पोस्टर दाखवत एलपीजी संकटाचा निषेध केला. सूत्रांच्या हवाल्याने पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार तृणमूल काँग्रेसने (टीएमसी) मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना त्यांच्या पदावरून हटवण्यासाठी दोन्ही सभागृहात प्रस्ताव आणला आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या की, परदेशातील घडामोडींमुळे देशात काही अडचणी येत आहेत. सरकार आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि पूर्णपणे तयार राहण्यासाठी पावले उचलत आहे. अशा वेळी, विरोधकांनी सरकारच्या खांद्याला खांदा लावून उभे राहिले पाहिजे, परंतु ते बेजबाबदारपणे वागत आहे. आपल्या भाषणादरम्यान, सीतारमण यांनी बिजनौरच्या नगीना येथील खासदार चंद्रशेखर रावण यांना त्यांच्या नावातून ''रावण'' हा शब्द काढून टाकण्यास आणि त्याऐवजी ''विदुर'' असे शब्द वापरण्यास सांगितले, कारण महाभारत संपल्यानंतर विदुर बिजनौरमध्ये आला होता. सीतारमण म्हणाल्या की, परदेशातील घडामोडी आपल्या देशासमोर आव्हाने निर्माण करत आहेत. तथापि, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली या आव्हानांना तोंड देण्यासाठी, आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि पूर्ण तयारी सुनिश्चित करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. यावेळी, विरोधी पक्षांनी सरकारसोबत खांद्याला खांदा लावून उभे राहून जनतेला आश्वस्त केले पाहिजे. उलट, ते बेजबाबदार पावले उचलून जनतेची दिशाभूल करत आहेत, ज्याचा तीव्र निषेध केला पाहिजे.

------------

### गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत

पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल. गॅस बुकींग ॲप आणि मिस्ड कॉल सेवांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याचे निर्देश तेल कंपन्यांना देण्यात आले आहेत. तसेच राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष तातडीने सुरू करून तक्रार निवारणासाठी व्हॉट्सॲप सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

----------

cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. १४ मार्च २०२६



## थोडक्यात



### आयएमए तर्फे बीड न.प. कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फुर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) व डब्ल्यूडीडब्ल्यू, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीड नगर परिषद, कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, उपाध्यक्ष विनोद मुळूक व मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडसे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी आयएमए बीडचे अध्यक्ष डॉ. अनंत मुळे, सचिव डॉ. अमोल गीते तसेच महिला विंगच्या अध्यक्षा डॉ. सुनीता बारकुल, डॉ. उषा काळे, डॉ. जयश्री घुगे आदींची उपस्थिती होती. शिबिरामध्ये डॉ. पौर्णिमा येन्दे, डॉ. संजीवनी कोटेचा, डॉ. सीमा जोशी, डॉ. सारिका वाघ, डॉ. अंजली बहीर, डॉ. उज्वला शिंदे, डॉ. अनुपम जेथलिया, डॉ. सुषमा खोसे व डॉ. अबोली पैठणकर या महिला डॉक्टरांनी आरोग्य सेवा दिली. शिबिरामध्ये नगर परिषद कर्मचाऱ्यांची रक्तदाब, मधुमेह, रक्त तपासणी तसेच इतर आवश्यक वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. तज्ज्ञ डॉक्टरांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करून नियमित तपासणीचे महत्त्व पटवून दिले.या उपक्रमामुळे नगर परिषद कर्मचाऱ्यांना आपल्या आरोग्याची तपासणी करून घेण्याची संधी मिळाली. उपस्थितांनी आयएमए बीड व डब्ल्यूडब्ल्यू बीड यांच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.



### जयभवानी महाविद्यालयाच्या युट्युब चॅनेलचे प्रकाशन संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पाटोदा येथील कला आणि विज्ञान महाविद्यालयाच्या अधिकृत युट्युब चॅनेलचे प्रकाशन प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

लॅपटॉप वर चॅनेलचे पब्लिश बटन क्लिक करून शिवाजीनगर, गढीच्या श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी महाविद्यालयाचे हे युट्युब चॅनेल प्रकाशित केले. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटोदाच्या कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते.प्रारंभी महाविद्यालयाच्या युट्युब - फेसबुक समितीचे प्रमुख प्रा. बापू घोक्षे, सदस्य प्रा. डॉ. कल्पना घारगे आणि प्रा. डॉ. प्रविण शिलेदार यांनी प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांचे स्वागत केले. याप्रसंगी बोलतांना प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले की, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शिक्षण, मूल्याधिष्ठित संस्कार आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेल्या पाटोद्याच्या जयभवानी महाविद्यालयाच्या विविध विभागांच्या उल्लेखनीय कामगिरीची माहिती, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचे प्रसारण या चॅनेलच्या माध्यमातून होईल. याप्रसंगी महाविद्यालयाच्या गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. विनोद किर्दक यांच्यासह महाविद्यालयाचे प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. प्रा. बापू घोक्षे यांनी प्रास्ताविक, डॉ. प्रविण शिलेदार यांनी आभार तर डॉ. कल्पना घारगे यांनी सूत्रसंचालन केले.

# आ.प्रकाश सोळंके यांच्या दुर्लक्षामुळे वडवणी -कवडगाव रस्त्याची दुरावस्था



वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव ते वडवणी दरम्यानच्या ९कि.मी रोडची अत्यंत दुरावस्था झाली आहे या रोडवर मोठमोठे खड्डे पडले असून या रोडवर साधे पायी चालणे मुश्कील झाले आहे मात्र वडवणी सा.बां.खात्याला याचे काहीच सोयरसुतक नाही आ.प्रकाशदादा आपणच दखल घेऊन अधिकार्यांचे कान टोचा जेणेकरून त्यांना जाग येईल.

याबाबत अधिक माहिती अशी की वडवणी तालुक्यातील वडवणी ते कवडगाव या१४कि.मी मार्गावरील वडवणी ते साळिंबादरम्यानच्या ५कि.मी.रोडचे गेल्या ६महिन्यापुर्वी हाटमिक्स डांबरीकरण करण्यात आले आहे मात्र त्या रोडवर ही साळिंबा तलावाजवळ पुलाचे काम व्यवस्थितपणे न केल्याने नाल्याचे पाणी रोडवर जमा होत आहे तसेच या दरम्यान आत्ताच केलेल्या डांबरीकरणावर खड्डे पडले आहेत तसेच साळिंबा ते पिंपरखेड धाईफाटा मोरेवाडी व कवडगाव या ९कि.मी. मार्गावर इतके खड्डे पडले आहेत कि वाहने तर सोडाच परंतु या रोडवर साधे पायी चालणे मुश्कील झाले आहे कवडगाव व परिसरातील जवळपास १५ते२० गावांना वडवणी या तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी याच मार्गावरून प्रवास करावा लागतो मात्र रोडची अत्यंत दयनिय अवस्था झाली असल्याने जनतेचे बेहाल आहेत खरंतर हा रोड पुर्णतः पक्का डांबरी असणे आवश्यक आहे परंतु होईल तेव्हा होईल सा.बां.खात्याने खड्डे बुजवून दुरुस्ती करून घेणे गरजेचे आहे मात्र वडवणी सा.बां.कार्यालय याकडे ढुंकूनही पाहत नाही तरी आ.प्रकाशदादांनी गांभीर्याने दखल घेऊन अधिकार्यांचे कान टोचुन निदान दुरुस्तीचे काम तत्काळ हाती घेण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना सुचना कराव्यात अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## कौठळी शिवारातील शेतातील हरभऱ्याचे ढीग पेटवून देणाऱ्या चौघांविरुद्ध परळी पोलिसांनी दाखल केला गुन्हा

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील एका शेतकऱ्याने शेतात घेतलेल्या हरभऱ्याच्या पिकाची काढणीनंतर लावलेले ढीग पेटवून देणाऱ्या चौघा विरोधात परळी ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या घटनेत शेतकऱ्याचे मात्र साडेतीन लाख रुपयांचे अंदाजे आर्थिक नुकसान झाले आहे.



याबाबत अजित विजयकुमार भताने वय वर्षे चाळीस राहणार विद्यानगर परळी वैजनाथ यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की त्यांच्या कौठाळी येथील शेतामध्ये नुकतेच हरभऱ्याच्या पिकाचे काढणी करून त्याचे दोन ढीग गट नंबर २२० मध्ये लावण्यात आले होते व त्या ठिकाणी त्यांचे सालगडी लक्ष देण्यासाठी शेतात झोपले होते दिनांक १० मार्च रोजी रात्री १२:४५ वाजण्याच्या सुमारास भताने यांच्या शेजारी शेत असलेल्या ज्ञानेश्वर वालचंद मुंडे रा. तळेगाव हे हरभऱ्याच्या ढिगास आग लावताना अचानक साल गड्यांना जाग आली तोपर्यंत आग लावली होती. साल गड्यांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता ज्ञानेश्वर मुंडे याने सालगड्यांना सुद्धा आगे मध्ये फेकून देण्याची धमकी दिली व ते तिथून पळून गेले आग लावणाऱ्यास साल गड्यांनी पाहिले होते. या आगीमध्ये अजित भताने यांचे तीन लाख ५० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

आग लावून आरोपी पळून जातात सालगडी यांनी फिर्यादी अजित भताने यांच्या वडिलांना मोबाईल वरून घटनेची माहिती दिली त्यानंतर अजित भताने व त्यांचे कुटुंबीय तात्काळ शेतात धावले व आरोपींना शोधण्याचा प्रयत्न केला परंतु आरोपी येथून पसार झाले अजित भताने यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलिसांनी ज्ञानेश्वर वालचंद मुंडे व इतर तिघेजण राहणार तळेगाव ,तालुका परळी यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३२६ ( एफ), कलम ३५१ (२),व कलम ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.दरम्यान यापूर्वी सुध्दा फिर्यादी अजित भताने यांच्या शेतात असणारा २५ एकर वरील सोयाबीन अज्ञात आरोपींनी पेटवून दिला होता.त्यामुळे आरोपींच्या कायमचा बंदोबस्त करण्याची मागणी भताने कुटुंबियां कडून होत आहे.

## मराठा सेवा संघ माजलगाव आयोजित इफ्तार पार्टीत हिंदू-मुस्लिम बंधुभावाचा संगम

माजलगाव । प्रतिनिधी

मराठा सेवा संघ माजलगाव आयोजित स्नेहमिलन व इफ्तार पार्टी दि १२ मार्च गुरुवार रोजी सायंकाळी ६:०० वाजता येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, माजलगाव येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाली. रमजानच्या पवित्र महिन्यात आयोजित या कार्यक्रमाला राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह मुस्लिम बांधवांनी उदंड प्रतिसाद दिला.

शिवरायांच्या छायेखाली हिंदू-मुस्लिम बंधुभावाची परंपरा आजही जीवंत आहे याचा प्रत्यय या कार्यक्रमाने दिला. समाजात बंधुभाव निर्माण व्हावा, सर्व धर्मांतील नागरिकांनी एकोप्याने जगावे यासाठी असे कार्यक्रम वारंवार घेणे आवश्यक आहे,अशा भावना उपस्थितांनी यावेळी उत्स्फूर्तपणे व्यक्त केल्या.

माजी बांधकाम सभापती जयसिंह सोळंके, महाराष्ट्रातील ख्यातनाम वक्ते प्रदीप दादा सोळंके,माजीद सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणातून हिंदू-मुस्लिम एकतेचे महत्त्व विशद केले व समाजात सौहार्दाचे वातावरण



टिकवण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष नासेर पठाण, भारतीय जनता पार्टीचे नेते अरुण राऊत, गटनेते राहुल लंगडे,गटनेते इमरान आगाखान, नगरसेवक भागवतराव भोसले,अँड नारायण गोले पाटील,नगरसेवक इद्रिस पाशा, नगरसेवक जुनेद खान,नगरसेवक मतीन शेख, नगरसेवक डॉ.सचिन देशमुख, नगरसेवक अभिजीत पोटभरे, युवा नेते राहुल जगताप,रामभाऊ जगताप,धनंजय पापा सोळंके,रोहन घाडगे,अर्जुन नाईकनवरे,प्रा. श्रीकिशन देशमुख, मुख्याध्यापक मनोज कुमार सोळंके यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष दिलीप धुमाळ यांनी केले. सूत्रसंचालन नारायण झोडगे यांनी केले तर आभार विलास शेजुळ यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पुरुषोत्तम जाधव,अर्जुन वाघ,विनोद गायकवाड,रामदास कापसे,बालासाहेब झोडगे,विकास गायकवाड,विनोद ठोंबरे,पदमाकर शिंदे,उत्तम पवार,गणेश ढीसले,सोमेश्वर मोरे,प्रताप धपाटे,भगवान गायकवाड,सचिन डुडुळे,विलास कोळपे,परमेश्वर आडागळे,दिगंबर मांडवगणे,कृष्णा तौर,गोपाल जाधव, दादासाहेब कचरे, ॲड.अनंत बादाडे, गणेश घाटूळ यांच्यासह मराठा सेवा संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## मंदोदरी परमेश्वरअप्पा घोंगडे यांचे वृद्धापकाळाने निधन

परळी । प्रतिनिधी

वीरशैव लिंगायत समाजातील जेष्ठ श्रीमती मंदोदरी परमेश्वरअप्पा घोंगडे यांचे आज गुरूवार दिनांक १२ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. नगर परिषदेचे पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी श्री सिध्देश्वर घोंगडे यांच्या मातोश्री होत.



श्रीमती मंदोदरी परमेश्वर घोंगडे रा.खंडोबा मंदिरच्या पाठीमागे, सावतामाळी मंदिर रोड, परळी वैजनाथ यांचे आज गुरूवारी वृद्धापकाळाने निधन झाले. श्रीमती मंदोदरी घोंगडे या अत्यंत प्रेमळ स्वभावाच्या असल्याने सर्वपरिचित होत्या. वीरशैव लिंगायत समाजाच्या विविध धार्मीक व सामाजिक कार्यात त्या नेहमी सक्रीय सहभागी असत. त्यांच्या पश्चात नगर परिषदेचे पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी श्री सिध्देश्वर घोंगडे हा एक मुलगा व एक मुलगी, सुन, नातू असा परिवार आहे. दरम्यान श्रीमती मंदोदरी परमेश्वरअप्पा घोंगडे यांच्या पार्थिवावर आज शुक्रवार दिनांक १३ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता वीरशैव लिंगायत स्मशानभूमी (कैलास धाम) परळी वैजनाथ येथे अंत्यविधी करण्यात येणार आहेत. घोंगडे परिवाराच्या दुःखात संपूर्ण नगरपरिषद परिवार सहभागी आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे उच्च शिक्षणात आमूलाग्र बदल होतील -प्राचार्य डॉ.रजनी शिखरे

गेवराई । प्रतिनिधी

कृत्रिम बुद्धिमत्ता हे अत्यंत प्रगत असे आधुनिक तंत्रज्ञान आहे. त्यामुळे मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात परिवर्तन होईल. विशेष करुन उच्च शिक्षण क्षेत्रातील बदल हे अमुलाग्र व दुरगामी असतील असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांनी केले. त्या महिला महाविद्यालय, गेवराई येथे कृत्रिम बुद्धिमत्ता, समाज : सामाजिक परिवर्तन, समानता आणि मानवी भविष्य या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होत्या.

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई येथे कृत्रिम बुद्धिमत्ता, समाज : सामाजिक परिवर्तन, समानता आणि मानवी भविष्य या विषयावर राष्ट्रीय परिषदे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेच्या उद्घाटक म्हणून र.भ.अट्टल महाविद्यालय च्या प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, कृत्रिम बुद्धिमत्ता ही आजच्या डिजिटल युगातील महत्त्वाची तांत्रिक क्रांती असून तिच्यामुळे मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्राबरोबर उच्च शिक्षण क्षेत्रात ही आमूलाग्र व दुरगामी असे बदल घडत आहेत. अध्यापन, संशोधन आणि ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव वाढत असून विद्यार्थ्यांनी या तंत्रज्ञानाचा सकारात्मक व सर्जनशील वापर करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे बिजभाषक राजीव गांधी केंद्रीय विद्यापीठ, अरुणाचल प्रदेश येथील प्रोफेसर डॉ. विनोद कुमार यादव आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे



### महिला महाविद्यालयामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर राष्ट्रीय परिषद उत्साहात संपन्न

नवीन रोजगार निर्मिती होईल तसेच तंत्रज्ञानाचे केंद्रीकरण झाल्याने आर्थिक विषमता वाढेल. अटोमेशन मुळे अकुशल कामगार मोठ्या प्रमाणात बेरोजगार होतील. त्यामुळे आपले रोजगार टिकवण्यासाठी आपण कृत्रिम बुद्धिमत्ता चे कौशल्य आत्मसात केले पाहिजे.

परिषदेच्या समारोप समारंभ चे प्रमुख अतिथी प्रमीलादेवी पाटील महाविद्यालय, नेकनूर चे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. दादासाहेब मोटे म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर कृत्रिम बुद्धिमत्ता चे ग्रामीण भागातील समाजावर होणारे परिणाम महत्त्वपूर्ण असणार आहेत. अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. तात्याराम सोंडगे म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्ता चा मानवी जीवनावर होणारा परिणाम लक्षात घेऊन या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेचे संस्थापक माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित, अध्यक्ष मा.श्री. जयसिंग पंडित, सचिव मा. श्री. अमरसिंह पंडित व आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या राष्ट्रीय परिषदेसाठी मिळालेला प्रचंड प्रतिसाद पाहता या विषयाचे महत्त्व अधोरेखित होते असे प्रतिपादन केले. यावेळी जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा चे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे व श्री. शिवाजीराव दादा पंडित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी चे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी ही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

उद्घाटन समारंभाचे सूत्र संचालन सह समन्वयक डॉ. संगीता आहेर यांनी केले. अतिथींचा परिचय डॉ. संजय भेदेकर यांनी करून दिला, तर संयोजक प्रोफेसर डॉ. दत्ता तंगलवाड यांनी आभार मानले. समारोप समारंभाचे सूत्र संचालन प्रा. डॉ. नामदेव शिनगारे यांनी केले. अतिथींचा परिचय प्रा. डॉ. रामहरी काकडे यांनी करून दिला, तर कार्यक्रमाच्या शेवटी समन्वयक प्रा. डॉ. राजाभाऊ चव्हाण यांनी आभार मानले.

या राष्ट्रीय परिषदेत विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कृत्रिम बुद्धिमत्ता, समाज, सामाजिक परिवर्तन आणि उच्च शिक्षण या विषयांवर संशोधन पर लेख सादर करण्यात आले. परिषदेच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि सामाजिक विचारांची देवाणघेवाण होऊन कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## पान ६ वरुन...

### बीड सांगवी येथे जागतिक

जजिरे. कार्याध्यक्ष शिवश्री लक्षण रेडेकर.बीडसागवी प्रथम नागरिक सौ शितल ताई करांडे.याची विशेष उपस्थिती लाभणार आहे . या मेळाव्याच्या माध्यमातून महिला साठी देणया बरोबर विविध सामाजिक उपक्रम विषयावर मार्गदर्शन होणार आहे. परिसरातील नागरिकांनी महिला जागतिक महिला दिनानिमित्त महिला मेळाव्या साठी जास्त जास्तीत मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिजाऊ ब्रिगेडच्या तालुका अध्यक्ष शिवमती आशा मनोहर करांडे यांनी केले आहे.जागतिक महिला दिनानिमित्त मेळावा मध्ये तानुबाई बिरजे पत्रकार परिषद यांच्या वतीने माध्यमातून राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवर जिजाऊ माँ साहेब आदर्श पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आले आहेत या पुस्तकात वितरण या समारंभ प्रसंगी मान्यवर हस्ते करण्यात होणार आहे.पुरस्कार प्राप्त व्यक्तींना वैयक्तिक रित्या कळविण्यात आले असुन संबंधितनी पुरस्कार स्वीकारसाठी उपस्थित रहावे असे आवाहन पुरस्कार समितीचे प्रमुख प्रा.डॉ बाबासाहेब मुटकुळे.व अध्यक्ष सिताराम पोकळे यांनी केले आहे.

### मतदारांनी २००२ च्या यादीशी लिंक

शोधण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. नागरिकांनी खालील संकेतस्थळावर जाऊन राज्य, जिल्हा, मतदारसंघ, मतदाराचे नाव आणि कॅप्चा भरून आपली माहिती तपासू शकतात. संकेतस्थळ://.../ मतदारांनी वेळेत ही प्रक्रिया पूर्ण केल्यास मतदान प्रक्रियेत कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. तसेच मतदार यादी अधिक पारदर्शक आणि अचूक राहण्यास मदत होईल. त्यामुळे शहरातील सर्व नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन सभापती निजाम शेख यांनी केले आहे.

मतदारांनी काय करावे?

* मतदार संघाचे नाव व क्रमांक तपासणे * मतदार यादीतील भाग क्रमांक शोधणे * अनुक्रमांक पडताळून पाहणे

आवश्यक कागदपत्रे

* आधार कार्ड * मोबाईल क्रमांक * नुकताच काढलेला पासपोर्ट फोटो

### गॅस एजन्सीवर गर्दी

२५ टक्केच लोक दिसतात. गॅस एजन्सीने ऑनलाईन प्रणाली द्वारे गॅस वितरण सुरू केले असून ज्यावेळी वार्डा वार्डामध्ये त्यांची वाहने गॅस वितरणासाठी जातात त्यावेळी इतर लोकही त्यांच्याबरोबर हुज्जत घालतात तर काहीजण जबरदस्तीने सिलेंडर उचलून नेण्याचा प्रयत्न करतात. अशा परिस्थितीमुळे गॅस एजन्सीने वाहनाद्वारे गॅस वितरण बंद केले असून आता नागरिकांना प्रत्यक्ष गोडाऊन वर जाऊन गॅस आणण्याची वेळ आली आहे. पूर्वी गल्लोगल्ली मध्ये गॅसचे वितरण होत होते. मुबलक गॅस मिळत होता मात्र आता युद्धजन्य परिस्थितीमुळे जिल्हा प्रशासनाने वितरण प्रणालीवर लक्ष ठेवून जे व्यावसायिक घरगुती वापराचा गॅस व्यवसायासाठी वापरतात त्यांच्यावर धाडी टाकून कारवाई सुरू केली आहे. वास्तविक पाहता यापूर्वीही हे लोक घरगुती गॅसच वापरत होते मात्र प्रशासन त्यावेळेस झोपेत होते .आता प्रशासनाला जाग आली असून आता प्रशासन प्रत्येक ठिकाणी धाडी टाकण्यासाठी पथके नेमत आहे. बीड जिल्ह्यामध्ये मुबलक गॅसचा साठा असल्याने नागरिकांनी गॅस एजन्सीवर गर्दी करू नये असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनीही केले आहे. मात्र या आवाहनाला फारसा प्रतिसाद मिळत नसून नागरिक तरीही मोठ्या प्रमाणात गॅस एजन्सीवर गर्दी करत आहेत. येत्या दोन-चार दिवसांमध्ये गॅस वितरण सुरळीत होईल असे गॅस एजन्सी मालक सांगतात.

### माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर

क्षीरसागर, वे शा स धुंडीराज महाराज पाटांगणकर श्रीहरी तुंगार रामप्रसादजी राठी स्व स्व मोतिरामजी वरपे डॉ श्रीहरी लहाने सुभाषचंद्र सारडा श्री शिवाजीराव पंडित संपादक स्व नामदेव क्षीरसागर आदी मान्यवरांना देण्यात आला आहे. या पुरस्कार सोहळ्यास शहरातील सर्वच सामाजिक आणि सेवाभावी संस्थेतील सदस्यांनी तसेच नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रोजेक्त चेअरमन सीए सुरेश लड्डा रोटरी क्लब अध्यक्ष विकास उमापूरकर सचिव सुमित जैस्वाल यांनी केले आहे

### पारनेर ग्रामपंचायतीतील

माहिती मिळण्यात होणारा विलंब हा अनेक प्रश्न निर्माण करणारा ठरत आहे. जर माहिती अधिकारातूनही नागरिकांना माहिती मिळत नसेल, तर सामान्य जनतेच्या प्रश्नांचे काय होणार, असा सवाल गावकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत लवकरात लवकर माहिती उपलब्ध करून देत नागरिकांच्या शंकांचे निरसन करावे, अशी मागणी होत आहे.

cmyk

# देशात दहा वर्षांत धान्योत्पादनात ४४ टक्के वाढ

## कृषिमंत्री चौहान यांची लोकसभेत माहिती

दिल्ली / वृत्तसंस्था

देशातील धान्य उत्पादनाने एक नवीन टप्पा गाठत, ते ३,५७० लाख टनांपर्यंत पोहोचले. गेल्या दहा वर्षांत देशातील धान्योत्पादनात ४४ टक्क्यांनी वाढ झाली आहे, अशी माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी लोकसभेत प्रश्नोत्तरादरम्यान दिली.

ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने तसेच धान्य उत्पादन वाढीसाठी अनेक शेती सुधारणा आणि धोरणे राबविण्यात आली आहेत. भारताने भात उत्पादनात जगात आघाडी घेतली आहे. भारत नुकताच चीनला मागे टाकत जगातील सर्वात मोठा तांदूळ उत्पादक देश बनला. देशाने कडधान्ये उत्पादनातदेखील लक्षणीय वाढ नोंदवली. कडधान्ये उत्पादन जे १९० लाख टनांवरून सुमारे २६० लाख टनांपर्यंत पोहोचले आहे, असेही कृषिमंत्री चव्हाण यांनी सांगितले. धान्य उत्पादनात संतुलित वाढ सुनिश्चित करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्यासाठी देशातील १०० जिल्ह्यांत पंतप्रधान धन-धान्य योजनेची




अंमलबजावणी करण्यात आली. पण पश्चिम बंगाल सरकारने ही योजना लागू केलेली नाही. शेतकऱ्यांच्या उत्पन्न आणि धान्य उत्पादन वाढीसाठी या योजनेअंतर्गत पश्चिम बंगालमधील पुरुलिया, दार्जिलिंग, अलीपूरद्वार आणि झाडग्राम या चार जिल्ह्यांची निवड केली असल्याचे ते म्हणाले. शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात खते मिळावीत, यासाठी केंद्राकडून गेल्या वर्षी १.८६ लाख कोटी रुपयांचे खत अनुदान देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. देशात २०१५-१६ मध्ये एकूण धान्योत्पादन २५१५.४२ लाख टन एवढे होते. २०२४-२५ मध्ये त्यात वाढ होऊन ते ३,५७७ लाख टनांवर पोहोचले. यात सुमारे ३.६ टक्के वार्षिक वाढ दिसून आली. २०२५-२६ मधील खरिपाच्या पहिल्या आगाऊ अंदाजानुसार, धान्य उत्पादन विक्रमी १,७३३.३० लाख टन होण्याची शक्यता आहे. तसेच २०२५-२६ मधील वार्षिक जीडीपीच्या दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार, शेती आणि त्याच्याशी संलग्न क्षेत्राचे एकूण सकल मूल्यवर्धन (जीव्हीए) ५२,०८,८०० कोटी इतके राहण्याचा अंदाज आहे, ज्यात २.४ टक्के वाढ दिसते.

## कोकण कन्याळ शेळीची जात पालनासाठी उत्तम पर्याय



सध्या शेळीपालन व्यवसाय हा मोठ्या प्रमाणावर केला जात असून, राज्यातील अनेक सुशिक्षित बेरोजगारांसाठी एक आर्थिक संधी म्हणून शेळीपालन व्यवसाय समोर आला आहे. कमी खर्चात व कमी जागेत चांगला नफा हा शेळीपालन व्यवसायाच्या माध्यमातून मिळणे शक्य आहे. मात्र, त्यासाठी गरज आहे ती व्यवस्थित नियोजनाची आणि शेळीपालनासाठी योग्य जातींची निवड या गोष्टींची होय. शेळ्यांच्या विविध प्रकारच्या प्रजाती भारतात आहेत व प्रजातीनुरूप वेगवेगळे गुणधर्म प्रत्येक शेळीचे आहेत.

व्यवसायासाठी जात निवड महत्वाची : शेळीपालनासाठी आपल्याला फायदा देऊ शकेल आणि उपयुक्त अशा जातीची निवड करणे खूप महत्त्वाचे आहे. याच पार्श्वभूमीवर आज आपण शेळीच्या एका महत्त्वपूर्ण जाती विषयी थोडक्यात माहिती जाणून घेणार आहोत. त्यामुळे आता तुम्ही देखील शेळीपालन व्यवसायाच्या माध्यमातून मोठया प्रमाणात नफा मिळवण्याच्या विचारात असाल तर तुम्ही 'कोकण कन्याळ' या जातीच्या शेळ्यांचे पालन करू शकतात.

कोकण कन्याळविषयी माहिती : कोकण कन्याळ या जातीच्या शेळीचा विचार केला तर ही कोकण किनारपट्टीलगत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, दोडामार्ग आणि कुडाळ या भागातील असून, विदर्भात देखील या जातीच्या शेळ्या काही प्रमाणात आढळतात. प्रामुख्याने मांस उत्पादनासाठी ही शेळी उपयुक्त असून, दर दोन वर्षात तीनदा करडांना जन्म देते.

किती वजन मिळते? ही शेळी वयाच्या १७ व्या महिन्यात पहिल्यांदा विते. तसेच तिचे दोन वेतातील अंतराचा विचार केला तर ते आठ महिने इतके असते. या शेळीचा सरासरी दूध उत्पादन काळ ९७ दिवसाचा असून, या कालावधीत ६० लिटर दूध देते. त्यासोबत या शेळीचा भाकड काळ ८४ दिवसांचा असतो. कोकण कन्याळ जातीच्या नराचे वजन हे २५ किलो तर मादी शेळीचे वजन २१ किलोपर्यंत भरते. एक ते दीड वर्षाच्या बोकडाच्या मटणाचा उतारा ५३ टक्के इतका असतो.

शेळीचे शारीरिक गुणधर्म : या जातीच्या शेळीच्या वरच्या जबड्यावर पांढऱ्या व तांबूस रंगाचे पट्टे असतात. या जातीच्या शेळीचे पाय लांब असून पायावर काळा पांढरा रंग असतो. पाय लांब व मजबूत असल्यामुळे या शेळ्या डोंगराळ भागात सहज जुळवून घेतात. शिंगे टोकदार असतात व कपाळ चपटे व रुंद असते. शिंगे हे सरळ व मागे वळलेली असतात. नाक रुंद असते व स्वच्छ असते.

## 'एआय' अंमलबजावणीचा कार्यभार उपसचिवांकडे

शेतीतील कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणासाठी २०२५-२९ या कालावधीसाठी ५०० रुपये कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यंदाच्या वर्षांमध्ये ३० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती लेखी उत्तरात कृषिमंत्री भरणे यांनी विधानसभेत दिली. तसेच 'एआय' धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी नियुक्त करण्याऐवजी त्याचा कार्यभार उपसचिवाकडे दिल्याचेही त्यांनी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाच्या अंमलबजावणी बाबत भोकरदनचे आमदार संतोष दानवे, समाधान अवताडे, अनिल पाटील, मनोज कायंदे, रोहित पवार, भास्कर जाधव, अमिन पटेल या सदस्यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला. "राज्यात कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित धोरण राबविण्यासाठी निवडण्यात आलेल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी रुजू होण्यास नकार दिला आहे. त्यामुळे हा प्रकल्प सहा महिन्यांपासून प्रलंबित आहे. जून २०२५ मध्ये पारदर्शक निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही प्रशासकीय स्तरावरील अटींच्या पूर्ततेअभावी पात्र तज्ज्ञांनी पदभार स्वीकारला नाही. त्यामुळे या पदाचा कार्यभार उपसचिवांकडे सोपविण्यात आला आहे हे खरे आहे का?, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने ५०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली असूनही केवळ धोरण आणि तांत्रिक मनुष्यबळाअभावी या निधीचा विनियोग संथ गतीने होत आहे हे खरे आहे का," असा प्रश्न उपस्थित केला. यावरील उत्तरात कृषिमंत्री भरणे म्हणाले, की निवड प्रक्रियेत अंतिम यादीतील उमेदवारांनी पदभार स्वीकारण्यास नकार दिला ही बाब खरी नाही. मात्र व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार उपसचिवांकडे देण्यात आलेला आहे. या योजनेसाठी २०२५-२९ या कालावधीसाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यापैकी २०२५-२६ साठी ३० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या धोरणांतर्गत अन्य तांत्रिक मनुष्यबळाची नियुक्ती करून अंमलबजावणी समाधानकारकरीत्या सुरू असल्याचे सांगितले.

निधी खर्चाचा आकडा नाही

कृषिमंत्री भरणे यांनी दिलेल्या लेखी उत्तरांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाच्या अंमलबजावणीसाठी यंदाच्या आर्थिक वर्षात ३० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगितले आहे. मात्र, यापैकी किती निधी खर्च झाला या बाबतची आकडेवारी मात्र देण्यात आलेली नाही.




# अवकाळी पावसात पिकांचे व्यवस्थापन

राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज दिलेला आहे. सध्या काही भागात रब्बी पिकांची काढणी-मळणी पूर्ण झाली आहे. परंतु काही भागात रब्बी पिके जसे ज्वारी, गहू, हरभरा, मका ही पिके शेतात उभी आहेत किंवा नुकतीच काढलेली आहे. अशा परिस्थितीत वादळी वाऱ्याचा, अवकाळी पावसाचा उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे हवामानाचा अंदाज घेऊन शेतकऱ्यांनी वेळीच नियोजन करणे अत्यंत आवश्यक असते. ही माहिती परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने दिली आहे.

काढणी केलेली पिके : रब्बी हंगामातील हरभरा, करडई, गहू आणि रब्बी ज्वारी ही पिके सध्या काढणीच्या अवस्थेत आहेत. अनेक ठिकाणी या पिकांची काढणीही पूर्ण झाली आहे. शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांची मळणी शक्य तितक्या लवकर करून घ्यावी. मळणी झालेला शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. मळणी तातडीने करता येत नसेल, तर काढणी केलेले पीक व्यवस्थित साठवून ठेवणे गरजेचे आहे. वादळी पावसाचा अंदाज असल्यामुळे काढणी केलेल्या धान्याचे वाळवणे लगेच शक्य होत नाही. अशावेळी शेतमाल आधी सुरक्षित ठिकाणी ठेवावा आणि पाऊस थांबल्यानंतर त्याचे वाळवण करावे. काढणी किंवा मळणी केलेला माल पावसात भिजणार



नाही याची काळजी घ्यावी. यासाठी शेतमाल शक्यतो उंच आणि सुरक्षित ठिकाणी साठवावा.

शेतात उभी पिके : उशिरा पेरणी केलेला गहू, ज्वारी आणि करडई ही पिके शेतात आता उभी आहेत. ती काढणीला आलेली असली तर ती तशीच राहू द्यावीत. पावसानंतर ऊन पडल्यामुळे पीक पुन्हा सुकून जाईल. त्यामुळे चिंता करु नये. धान्य पिकांच्या व्यतिरिक्त हळद, ऊस, उन्हाळी भूईमूग, उन्हाळी तीळ यांमध्ये काळजी घेण्याची गरज आहे.

हळद : सध्या हळदीची काढणी,हळद उकडणे,वाळवणे, पॉलिश करणे ही कामे सुरू आहेत. हळद पिकात हळद काढणी करण्यापूर्वी पंधरा दिवस आधी पिकाला पाणी देणे बंद करावे. हळद पिकाची पाने पिवळी पडून जमिनीवर लोळतात तेव्हा हळदीची काढणी करावी. कंद काढणीपूर्वी संपूर्ण पाने जमिनीलगत कापून घ्यावी. तसेच पावसाच्या शक्यतेमुळे हळदीची उघड्यावर साठवण करू नये.

ऊस : उसामध्ये आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. ऊस पिकावर खोड किडीचा प्रादूर्भाव दिसून आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २० टक्के २५ मिली किंवा क्लोरॅट्रानोलीप्रोल १८.५ टक्के ४ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड बघून फवारणी करावी.

उन्हाळी पिके : उन्हाळी पिकामध्ये भूईमूग पिकासाठी हा पाऊस फायदेशीर राहू शकतो. परंतु पावसानंतर पाणी साचून राहिल्यास त्याचा लवकरात लवकर निचरा करावा. पाणी साचून राहिल्यामुळे शेतामध्ये अडचण होण्याची शक्यता आहे. उन्हाळी तीळ पिकामध्ये मध्यम जमिनीत ८ ते १० दिवसांनी व भारी जमिनीत १२ ते १५ दिवसांच्या अंतराने सिंचन करावे. सिंचन हे शक्यतो तूषार सिंचन पध्दतीने करावे. उन्हाळी तीळ पिकास खताची दूसरी मात्रा देतांना त्यासोबत गंधक २० किलो प्रति हेक्टरी देण्यात यावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९३१ : 'आलम आरा' हा पहिला भारतीय बोलपट मुंबईतील नॉव्हेल्टी चित्रपटगृहात प्रदर्शित झाला.
१९५४ : दिल्ली येथे साहित्य अकादमीची स्थापना झाली.
१९५५ : राजकुमार महेन्द्र हे नेपाल देशाचे राजा बनले.
१९६७ : अमेरीकेचे माजी अध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांचे पार्थिव आर्लिंग्टन राष्ट्रीय दफनभूमी येथे हलविण्यात आले.
१९७६ : अमेरिकेने नेवादा या ठिकाणी परमाणु चाचणी केली.
१९८८ : जपानमध्ये समुद्रांतर्गत रेल्वे वाहतुकीस प्रारंभ
१९८८ : गणित प्रेमीनी प्रथम पाय डे साजरा केला होता. पाय डे संकल्पना भौतिकशास्त्रज्ञ लॅरी शॉ यांनी १९८८ मध्ये केली होती. (= ३.१४) ही पायाची किंमत दिनांक १४/३ प्रमाणे असल्याचे त्यांच्या लक्षात आले.
१९८८ : प्रथम सोनिया गांधी राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टीच्या अध्यक्ष बनल्या.
२००० : कलकत्ता येथील 'टेक्निशियन आय' हा देशातील सर्वात जुना स्टुडिओ आगीच्या भक्ष्यस्थानी पडला.
२००१ : व्ही. व्ही. एस. लक्ष्मणने ईडन गार्डन वर नाबाद २७५ धावा काढून या मैदानावरील सर्वोच्च धावांचा सुनील गावसकरचा विक्रम मोडला. तसेच एका डावात ४४ चौकार मारण्याच्या डॉन ब्रॅडमन यांच्या विक्रमाची बरोबरी केली.
२००१ : चोकिला अय्यर यांनी भारताच्या पहिल्या महिला परराष्ट्रसचिव म्हणून सूत्रे हाती घेतली. त्या सिक्कीममधील आदिवासी समाजातील असून १९६४ च्या बॅचमधील आय. ए. एस. अधिकारी आहेत.
२००७ : कारगिल आणि स्कार्दू यादरम्यान भारत व पाकिस्तान यांच्यात बस सेवा प्रारंभ करण्याबद्दल सहमती झाली.
२०१० : ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या हस्ते 'लोकसंस्कृती'चे उपासक आणि संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे यांना 'पुण्यभूषण पुरस्कार' पुण्यात देण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३३ : पहिली महिला दंतचिकित्सक हॉब्स टेलर यांचा जन्मदिवस.
१८७४ : फिलिप्स इलेक्ट्रॉनिक्स कंपनी चे सहसंस्थापक आंतोन फिलिप्स यांचा जन्म. (मृत्यू: ७ ऑक्टोबर १९५१)
१८७९ : अल्बर्ट आइनस्टाईन नोबेल पारितोषिक विजेते जर्मन-अमेरिकन भौतिकशात्रज्ञ (मृत्यू: १८ एप्रिल१९५५)
१८९९ : इर्विंग ओईल कंपनी चे संस्थापक के. सी. इर्विंग यांचा जन्म. (मृत्यू: १३ डिसेंबर १९९२)
१९०८ : विन्सेंट मोटारसायकल कंपनी चे संस्थापक फिलिप व्हिन्सेंट यांचा जन्म. (मृत्यू: २७ मार्च १९७९)
१९३१ : प्रभाकर पणशीकर ख्यातनाम अभिनेते (मृत्यू: १३ जानेवारी २०११)
१९३३ : मायकेल केन ब्रिटिश अभिनेता
१९६१ : ब्लॅकबेरी लिमिटेड चे संस्थापक माईक लाझारीडीस यांचा जन्म.
१९६३ : ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू ब्रूस रीड यांचा जन्म.
१९६५ : भारतीय चित्रपट सुष्टीतील मिस्टर परफेक्टनिस्ट म्हणून ओळखले जाणारे प्रसिद्ध अभिनेता अमीर खान यांचा जन्मदिन.
१९७२ : भारतीय कवी इरोम चानू शर्मिला यांचा जन्म.
१९७४ : साधना घाणेकर ऊर्फ 'साधना सरगम' पार्श्वगायिका

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८३ : कार्ल मार्क्स, समाजवादी विचारवंत व लेखक
१८८३ : कार्ल मार्क्स जर्मन तत्त्वज्ञ व कम्युनिझमचे प्रणेते (जन्म: ५ मे १८१८)
१९३२ : जॉर्ज इस्टमन अमेरिकन संशोधक व इस्टमन कोडॅक कंपनीचे संस्थापक (जन्म: १२ जुलै १८५४)
१९६३ : भारताचे प्रमुख स्वतंत्रता सेनानी, राजस्थानचे पूर्व मुख्यमंत्री आणि 'भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस' चे प्रसिद्ध नेता जयनारायण व्यास यांचे निधन.
१९९८ : दादा कोंडके अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक, संवादलेखक (जन्म: ८ ऑगस्ट १९३२)
२००३ : कवी सुरेश भट (जन्म: १५ एप्रिल १९३२)
२०१० : गोविंद विनायक तथा 'विंदा' करंदीकर लेखक, कवी, लघुनिबंधकार व टीकाकार.(जन्म: २३ ऑगस्ट १९१८)
२०१८ : विश्व प्रसिद्ध इंग्रजी भौतिकशास्त्रज्ञ, लेखक तसेच, सिद्धांत कॉस्मोलॉजी सेंटर फॉर रिसर्चचे डायरेक्ट स्टीफन्स हॉकिंग यांचे निधन.

## १७ ते २० मार्च दरम्यान राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता

### शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे



मुंबई : १७ ते २० मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते.

या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील नाकारता येत नाही. सध्याच्या अंदाजानुसार १८ ते २० मार्च दरम्यान या हवामान घडामोडींची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शनिवार दि.१४ मार्च २०२६
५

# मंठा पोलीस ठाण्याचा लाचखोर पोलीस निरीक्षक व पोलीस अंमलदार अँटीकरप्शनच्या जाळ्यात!

## पोलिसांच्या हप्तेखोर वृत्तीमुळे पोलिसांची प्रतिमा डागाळली

मंठा। प्रतिनिधी

वाळू वाहतुकीच्या टिप्परवर कारवाई न करण्यासाठी मासिक हप्ता म्हणून ५००००/- रुपयाची मागणी करून त्यातील १००००/- रुपये घेऊन उर्वरित ४००००/- रुपयापैकी तडजोडी अंती ठरलेले ३००००/- रुपये स्वीकारताना वसुली पोलीस अंमलदार रवी जाधव यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. या प्रकरणात मंठा पोलीस ठाण्याचा पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड हा सहभागी असल्याचे स्पष्ट झाल्याने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दोघांवरही कारवाई केली आहे.

पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड व पोलीस अमलदार रवी जाधव यांनी तक्रारदार यांच्याकडे वाळू वाहतुकीच्या वाहनावर कारवाई न करण्यासाठी लाच मागितली. परंतु लाच देण्याची तक्रारदाराची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे समक्ष हजर राहून तक्रार नोंदवली. या तक्रारीच्या अनुषंगाने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक तथा सापळा अधिकारी संतोष तिगोटे व कर्मचाऱ्यांनी गुरुवार (ता.१२) रोजी मंठा पोलीस स्टेशनमध्ये सापळा लावून तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचा समक्ष लाच मागणी पडताळणी केली असता पोलीस अंमलदार रवी जाधव याने तक्रारदार यांना त्यांच्या टिप्परवरती कोणतीही कार्यवाही न करण्यासाठी एकूण ५५०००/- रुपयाची लाच मागणी करून



तडजोडी अंती ३००००/- रुपये स्वीकारण्याचे पंचा समक्ष मान्य करून लाचेची रक्कम मंठा पोलीस स्टेशनच्या गोपनीय शाखेत स्वीकारली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी पोलीस अंमलदार रवी जाधव याची अंगझडती घेतली असता लाचेची रक्कम ३००००/- रुपये व सॅमसंग कंपनीचा मोबाईल मिळून आला असून तो जप्त करण्यात आला आहे. यात लाच स्वीकारण्यासाठी पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड याने पोलीस अंमलदार रवी जाधव यास प्रोत्साहन दिल्याचे पडताळणीत आढळून आल्याने दोघांवर कारवाई करण्यात आली. ही कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, पोलीस उपअधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष तिगोटे, तपास अधिकारी पोलीस उपअधीक्षक बाळू जाधवर, पोलीस हवालदार राजेंद्र सिनकर, अशोक नागरगोजे, सी एन बागुल यांनी केली आहे. यापूर्वी मंठा पोलीस स्टेशनचे तत्कालीन पोलीस निरीक्षक विलास निकम यांच्यावरही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली होती. पोलीस निरीक्षकावर कारवाई होण्याची ही दुसरी घटना आहे. लाचखोर पोलिसांमुळे संपूर्ण पोलीस खात्याची प्रतिमा डागाळली असून मंठा पोलीस स्टेशनला कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षकाची नेमणूक करावी अशी मागणी होत आहे.

## अंबडमध्ये धाडसी चोरी; सीसीटीव्हीत दोन चोरटे कैद पोलिसांना तपास सोप्पा



अंबड । प्रतिनिधी

शहरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आज दिनांक १२ मार्च रोजी पहाटे सुमारे ४ वाजेच्या सुमारास जालनाबीड रोडवरील जय भवानी मंगल कार्यालय, अंबड येथे धाडसी चोरीची घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, या मंगल कार्यालयाचे मालक उमेश सेठ भवर यांच्या जनरेटरमधील ७.५० चा अल्टरनेटर डायनमो अज्ञात दोन चोरट्यांनी चोरी करून नेला. या डायनमोची किंमत अंदाजे ₹५२,००० असल्याचे सांगितले जात आहे. चोरट्यांनी पहाटेच्या सुमारास संधी साधत जनरेटरमधील जुना वापरता डायनमो काढून नेला. विशेष म्हणजे, ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून त्यामध्ये दोन चोरटे स्पष्टपणे दिसत आहेत. त्यामुळे पोलिसांना आरोपींपर्यंत पोहोचणे सोपे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या घटनेची माहिती अंबड पोलिसांना देण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. मात्र, अंबड शहरात दिवसेंदिवस चोरीच्या घटना वाढत असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. शहरात पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून चोरट्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. सध्या पोलिस सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा शोध घेत आहेत.

# दोन कारच्या ओव्हरटेकच्या स्पर्धेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

लातूर। प्रतिनिधी

कार दुचाकीचा भीषण अपघात होऊन दुचाकीस्वार युवक जागीच ठार झाल्याची घटना नांदेड - उदगीर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० वर पाटोदा खूर्द (ता. जळकोट) येथे गुरुवारी घडली.

धडक दिलेली कार व थार गाडी यांच्यात ओव्हरटेक करण्याची स्पर्धा सुरू होती. या स्पर्धेच्या नादात धडक लागून दुचाकीस्वाराचा नाहक मृत्यू झाला आहे. राष्ट्रीय महामार्गावर सतत होणारे अपघात व त्यातून होणारी जीवितहानी हा एक चिंतेचा विषय बनत चालला आहे. घोणसी (ता. जळकोट) येथील साईनाथ जयराम जानतिने (३५) हे घोणसी येथून दुचाकीने जळकोटकडे येत होते. तर



एक कार जळकोटकडून उदगीरच्या दिशेने जात होती. ही दोन्ही वाहने राष्ट्रीय महामार्गावरील पाटोदा खुर्दजवळ येताच त्यांची आमनेसामने जोरदार धडक झाली. धडक एवढी जबरदस्त होती दुचाकीस्वार साईनाथ जानतिने हे आकाशात काही फूट उंच उडाले व दोनशे फूट दूर फेकल्या गेले. तसेच रस्त्याच्या बाजूला असलेल्या खड्यात जाऊन पडले, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. खाली पडल्यानंतर जागेवरच त्यांचा मृत्यू झाला. मृत तरुण एका खासगी कंपनीत नोकरीला आहे. तो कामावर जळकोटला येत असताना हा अपघात झाला. या धडकेने कारच्या समोरचा भागही चेंदामेंदा झाला आहे. मृत साईनाथ जानतिने यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा, बहीण, भाऊ व आई-वडील असा परिवार आहे. या घटनेमुळे परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. अपघातग्रस्त व्यक्तीचा मृतदेह ग्रामीण रुग्णालय, जळकोट येथे उत्तरीय तपासणीसाठी आणण्यात आला आहे.

# टॅक्सी चालकांना धर्मवीर आनंद दिघे कल्याणकारी मंडळात नोंदणीचे आवाहन

जालना । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या वतीने ६५ वर्षांवरील रिक्षा व मीटर टॅक्सी परवानाधारक चालकांसाठी धर्मवीर आनंद दिघे कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली असून, पात्र चालकांसाठी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पात्र रिक्षा व मीटर टॅक्सी चालकांनी या संकेतस्थळावर जावून ऑनलाइन नोंदणी करावी. ही नोंदणी मोबाईलद्वारे घरबसल्या किंवा कोणत्याही सायबर कॅफेमधून करता येणार आहे. अर्ज भरताना काही अडचण आल्यास उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या मदत कक्षाशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

या योजनसाठी चालक हा महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा. तसेच त्याच्याकडे किमान पाच वर्षांपूर्वीचा परवाना असणे आवश्यक आहे. रिक्षा किंवा मीटर टॅक्सी चालवत असताना त्याच्याकडे कोणतेही चारचाकी वाहन नसावे, अशी अटही ठेवण्यात आली आहे. या कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून रिक्षा व मीटर टॅक्सी परवानाधारक चालकांना सामाजिक सुरक्षा व विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. ६५ वर्षांवरील सभासद चालकांना निवृत्ती सन्मान योजनेअंतर्गत सन्मान निधी दिला जाणार असून, चालकांसाठी विमा व आरोग्य योजनाही राबविण्यात येणार आहेत. तसेच चालकांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येणार असून, कर्तव्यावर असताना चालकास दुखापत झाल्यास कल्याणकारी मंडळामार्फत आर्थिक सहाय्यही करण्यात येणार आहे. पात्र चालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांनी केले आहे.

# संत एकनाथ साखर कारखान्यावर प्रशासक नियुक्त करा - आ. भुमरे

संभाजीनगर । प्रतिनिधी

संत एकनाथ सहकारी साखर कारखाना करारावर चालविणारे सचिन घायळ शुगर मिल या प्रायव्हेट कंपनीने नियमाचे उल्लंघन केल्याचे आमदार विलास भुमरे यांनी म्हटले आहे.



राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभा सभागृहात लक्षवेधी प्रश्न मांडून एकनाथ कारखान्यावर प्रशासक नियुक्त करावा, करार रद्द करण्याच्या कारवाईला विलंब लावणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे केली आहे. संत एकनाथ साखर कारखान्याची मालमत्ता बुलढाणा अर्बन बँकेत गहाण ठेवून तीस कोटी रुपये कर्ज उचलून १६ कोटी रुपये हडप केल्याच्या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. संत एकनाथ कारखाना चालविणाऱ्या सचिन घायाळ शुगर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या कामकाजाविषयी आमदार विलास भुमरे यांनी गुरुवारी विधानसभेतील अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला. कारखान्यावर प्रशासक नियुक्त करून कारवाईला विलंब लावणाऱ्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी लक्षवेधी स्वरूपात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे मांडली. दरम्यान, कारखान्याच्या कामगारांनी वेतन थकीत ठेवल्याप्रकरणी न्यायालयामध्ये याचिका दाखल केली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार कामगारांचे वेतन वसूल करण्यासाठी महसूल प्रशासनाच्या वतीने एकनाथ साखर कारखान्याच्या दोनाखर गोडाऊनला सील लावण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. संत एकनाथ कारखान्याची मालमत्ता गहाण ठेवून कर्ज घेणारे सचिन घायल शुगर प्रा. लि. कंपनी विरुद्ध बुलढाणा अर्बन को. क्रे. सोसायटीच्यावतीने पैठण एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरील घोटाळ्याची व्याप्ती मोठी असल्याने या प्रकरणाचा तपास करण्यासाठी आर्थिक गुन्हे शाखा स्वतंत्र तपास पदकाचे पोलिस उपनिरीक्षक मधुकर मोरे, पोकॉ नीलेश गायकवाड, राजेंद्र बोरसे, गणेश पंडुरे, आजिनाथ तिडके यांच्यासह मोरे यांनी संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याच्या कार्यालयातील महत्त्वाचे संगणक, विविध अभिलेख दस्तावेजांची तपासणी करून ते जप्त केले आहेत.

# इस्त्रो सहलीसाठी नऊ तालुक्यांमधून तब्बल ९२ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला (इस्त्रो) भेट देण्यासाठी जिल्हा परिषद शाळांमधील निवडक विद्यार्थ्यांची सहल नेण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व नऊ तालुक्यांमधून निवडलेल्या ९२ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर चाचणी परीक्षा घेण्यात आली. यातून सुमारे तीस विद्यार्थ्यांची सहलीसाठी निवड करण्यात येणार आहे.

शहरातील बळीराम पाटील हायस्कूल येथे जिल्हास्तरीय अंतिम टप्प्याची परीक्षा घेण्यात आली. याआधी केंद्रस्तर व तालुकास्तर यामध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीलय अंतिम टप्प्यासाठी निवड करण्यात आली. ही परीक्षा ७५ गुणांची वस्तुनिष्ठ प्रश्न, २० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा आणि ५ गुणांची तोंडी परीक्षा अशी एकूण शंभर गुणांची होती. ग्रामीण



भागातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांमधे वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा व भविष्यातील शास्त्रीय दृष्टिकोनाची बीजे त्यांच्यामध्ये रुजली जावी याकरिता जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरचा शिक्षण विभाग दरवर्षी ही चाचणी आयोजित करण्यात येते. या माध्यमातून ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ही दुर्मिळ संधी उपलब्ध करून दिल्या जाते. जिल्हास्तरावर गुण-वत्ता यादीत आलेले विद्यार्थी हे विमानाद्वारे इसरो सेंटर येथे भेट देतील. सदर इस्त्रो सहल निवड प्रक्रियेचे नियोजन आयोजन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित आणि जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण मार्गदर्शनाखाली करण्यात आले. झालेल्या जिल्हास्तरीय इस्त्रो निवड चाचणीचे संनियंत्रण शिक्षण विस्तार अधिकारी संगीता सावळे आणि मनीषा वाशिंबे यांनी केले. बळीराम पाटील हायस्कूलचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच शहरातील शाळांमधील विज्ञान शिक्षक यांनी संपूर्ण परीक्षा प्रक्रियेची जबाबदारी पार पाडली.

# मानवत-पाथरी महामार्गावर उभ्या टिप्परला दुचाकीची धडक; तीन युवक जखमी

परभणी । प्रतिनिधी

मानवत-पाथरी राष्ट्रीय महामार्गावर उभ्या असलेल्या टिप्परला दुचाकी धडकून झालेल्या अपघातात तीन युवक जखमी झाले. ही घटना गुरुवारी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास तहसील कार्यालयाजवळ घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या टिप्परला कोणताही रिफ्लेक्टर किंवा इशारा दर्शवणारा इंडिकेटर नसल्याने हा अपघात झाल्याचे सांगितले जात आहे. एमएच २४ एयू ७५६१ क्रमांकाचा टिप्पर बिघाड झाल्यामुळे रस्त्यालगत उभा करण्यात आला होता. प्रथमेश ज्ञानेश्वर केदारे, आकाश शिवाजीराव वांगीकर आणि पृथ्वीराज विश्वनाथ गायकवाड (सर्व रा. पाथरी) हे तिघे एमएच २२ बीजी १७१४ क्रमांकाच्या दुचाकीवरून मानवत येथील कॉलेज मैदानावर खेळून पाथरीकडे जात होते. अंधारामुळे रस्त्यावर उभा असलेला टिप्पर न दिसल्याने त्यांची दुचाकी थेट टिप्परच्या मागील बाजूस जाऊन धडकली. या अपघातात तिन्ही युवक जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करून जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. त्यापैकी प्रथमेश केदारे आणि पृथ्वीराज गायकवाड यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी परभणी येथे हलविण्यात आले आहे.

# शरद सावंत यांना मराठवाडा ग्लोबल उद्योजक पुरस्कार प्रदान



कळंब । प्रतिनिधी

तालुक्यातील पाथर्डी येथील भूमिपुत्र सध्या पुणे येथे स्थायिक असणारे उद्योजक शरद सावंत यांना मराठवाडा युवा मंच पुणे यांच्या वतीने ''मराठवाडा ग्लोबल उद्योजक'' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले हा पुरस्कार पुणे येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग निगडी प्राधिकरण येथील सांस्कृतिक सभागृहात हा पुरस्कार देण्यात आला.

सावंत हे गेल्या पंधरा वर्षांपासून पुणे येथे एसपीजी प्रोसेस इक्विपमेंट इंडिया या कंपनीचे मुख्य प्रवर्तक म्हणून कार्यरत असून त्यांनी या कंपनीच्या माध्यमातून मराठवाड्यातील अनेक तरुणांच्या हाताला काम दिले असून त्यांच्या या कार्याची दखल घेत मराठवाडा युवा मंच वतीने त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. या पुरस्काराचे वितरण इन्कम टॅक्स कमिशनर पुणे डॉ संतोष मानकोस्कर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पुणे येथील पोलीस उपायुक्त डॉ राजकुमार शिंदे, जॉईंट डायरेक्टर एमपीसीबी मुंबई येथील सतीश पडवळ, पुणे येथील उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त रवी पवार, पुणे येथील जॉईंट डायरेक्टर इंडस्ट्रियल हेल्थ अँड सेफ्टी सुधीर शिंदे, जीएसटी चे सहाय्यक आयुक्त श्याम केंद्रे, मराठवाडा युवा मंचचे अध्यक्ष सत्यजित चौधरी, मराठवाडा युवा मंच सदस्य रामेश्वर गटकळ आदी उपस्थित होते ज्यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला हे सर्व वरिष्ठ अधिकारी मराठवाड्याचे भूमिपुत्र आहेत हे विशेष. सावंत यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर आमदार कैलास घाडगे पाटील तसेच कळंब तालुक्यातील मित्रपरिवार यांनी अभिनंदन केले आहे. त्यांना हा मराठवाड्याचा पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

# लोहा कंधार रा.म.प्रकल्प आणि खरवंडी पोलीस स्टेशन निर्मिती साठी अधिवेशनात आ.राजळे यांनी वेधले लक्ष

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील गेलेल्या लोहा कंधार ३६१ राष्ट्रीय महामार्ग खरवंडी कासार ते नवगण राजुरी या ३९ किमी लांबीच्या राष्ट्रीय महामार्गाला २०१८ ला मंजुरी मिळाली ३७४ कोटीचा प्रकल्प जवळपास आठ वर्षापासून प्रलंबित आहे जे काम केले ते अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले आहे राष्ट्रीय महामार्गाचा दर्जेदार रस्त्याचा प्रकल्प जिल्हा मार्गाप्रमाणे केला आहे खरवंडी कासार ढाकणवाडी फाटा इथपर्यंत ड्रेनेज लाईन साईड गटार पथदिवे काम केली नाहीत खरवंडी कासार मालेवाडी मुंगूसवाडे भालगाव या गावातील शेतकऱ्यांचे जमिनीचे निवाडे मावेजा प्रलंबित आहे.

आठ वर्षापासून राष्ट्रीय महामार्ग खुळखुळा झाला आहे तसेच खरवंडी कासार ते भालगाव पर्यंत रस्त्यांच्या मधोमध प्याचेस अर्धवट सोडले असून यामुळे गंभीर अपघात झाली आहेत काही जायबंदी झाले तर काहींना आपला जीव गमवावा लागला.

याला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी जबाबदार असल्याचे आमदार मोनिका राजळे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी मुद्दा मांडला तसेच पाथर्डी तालुक्यातील अनेक वर्ष मागणी होत असलेल्या खरवंडी कासार नवीन पोलीस स्टेशन निर्मितीचा मुद्दा लक्षवेधी मध्ये आमदार मोनिका राजळे यांनी मांडला आहे या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी तातडीने चर्चा करून लोहा कंधार ३६१ एफ राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करणे व खरवंडी कासार येथे नवीन पोलीस स्टेशनची निर्मिती करण्यास तातडीने मंजुरी देणे या मागण्या विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनात केले आहेत.

यामुळे पाथर्डी तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल असल्याचे मानले जात आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण बेलापूर मुंबई येथे कार्यकारी अभियंता संतोष शेलार अधीक्षक अभियंता वृषाली गाडेकर यांची आमदार मोनिका राजळे यांच्या समवेत मिडसांगवी येथील शिष्टमंडळ दत्तू नाना पठाडे रामभाऊ पठाडे धनंजय पठाडे अमोल पठाडे पैठण पंढरपूर पालखी मार्ग व लोहा कंधार राष्ट्रीय महामार्ग ३६१ एफ शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहण केलेल्या जमिनीचे निवाडे करून तातडीने मावेजा मिळवून देण्यात यावा व महामार्गाचे काम तातडीने सुरू करण्याचे आदेश राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कार्यकारी अभियंता संतोष शेलार त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहे.

# गॅस एजन्सीवर गर्दी करणारे २५ टक्केच गरजू

## अफवांमुळे ज्यांच्याकडे गॅस शिल्लक आहे तेही लाईनमध्ये उभे

बीड । प्रतिनिधी

आखाती देशामध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने आगामी काळात गॅसचा तुटवडा होईल या भीतीने बीड शहरांमध्ये अनेक जण आपल्याकडे गॅस उपलब्ध असतानाही शिल्लक टाकी भरून घेण्यासाठी गर्दी करत आहेत. वास्तविक पाहता गॅससाठी लाईन मध्ये उभे राहणारे तात्काळ गॅसची गरज असणारे पंचवीस टक्केच लोक आहेत.मात्र पुढची सोय म्हणून अनेक जण लाईनमध्ये उभे राहून गर्दी करताना दिसत आहेत. यामुळे गॅस वितरणात मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. दरम्यान जिल्हा प्रशासनाने घरगुती गॅस







व्यवसायासाठी वापरण्यावर बंदी घातली असून गेल्या दोन दिवसापासून अनेक ठिकाणी धाडी टाकून घरगुती वापराचे गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहे. दरम्यान जिल्हा रुग्णालया मध्येही घरगुती गॅस वापरला जात असल्याचे निदर्शनास येत असून जिल्हा प्रशासन या ठिकाणी काय कारवाई करते याकडे लक्ष लागले आहे.

सध्या अमेरिका आणि इराण या दोन देशांमध्ये युद्ध सुरू आहे. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅसचा तुटवडा होईल या भीतीने नागरिकांमध्ये खळबळ माजली असून अनेक जण पुढची सोय म्हणून गॅस एजन्सीवर मोठ्या प्रमाणात गर्दी करताना दिसत आहेत. या गर्दीमध्ये ज्यांना अत्यावश्यक गॅस अत्यावश्यक आहे असे पान ३ वर

### पुन्हा पूर्वीची परिस्थिती

पूर्वीच्या काळी लोक इंधन म्हणून लाकूड फाटा शेतातील काड्या कुड्या याचा वापर करून चुलीवर स्वयंपाक करत असतात. ग्रामीण भागात तर सर्रास याचाच वापर होत असे. ग्रामीण भागात गॅस नावालाही माहीत नव्हता. मात्र आता गावागावात गॅस झाल्याने लाकूड इंधनाचा वापर खूप कमी झाला. मात्र गॅसचा तुटवडा झाला तर पुन्हा पूर्वीप्रमाणे लाकडाचा इंधन म्हणून वापर मोठ्या प्रमाणात सुरू होईल आणि जे लोक जास्तीचे पैसे देऊन चुलीवरचे जेवण घेण्यासाठी जायचे त्यांना आता घरीच चुलीवरचा स्वयंपाक मिळणार आहे.

### जिल्हा रुग्णालयातही घरगुती गॅसचा वापर

जिल्हा रुग्णालयातील कॅन्टीन एका व्यावसायिकाला चालवण्यात दिलेली आहे. वास्तविक पाहता या ठिकाणी व्यावसायिक वापराचा गॅस वापरणे आवश्यक असतानाही या ठिकाणी सर्रास घरगुती गॅसचा वापर होत असून जिल्हा प्रशासन यावर काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### इराण अमेरिकेने चुलीवरच्या स्वयंपाकाची सोय केली

पूर्वीच्या काळी ग्रामीण भागात सर्रास चुलीवरचा स्वयंपाक असायचा मात्र मध्यंतरी मध्यंतरीच्या काळामध्ये ग्रामीण भागातही गॅसचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झाला त्यामुळे लाकूड इंधनाचा वापर करून चुलीवरचा स्वयंपाक जवळपास बंदच झाला होता. अनेक जण चुलीवरचे जेवण घेण्यासाठी जास्तीचे पैसे मोजून धाब्यावर हॉटेलवर जेवायला जायचे आता या युद्धाने अनेकांची घरीच सोय केली असून चुलीवरचा स्वयंपाक आता घरीच जेवायला मिळणार आहे.

# मतदार यादी पडताळणी प्रक्रियेत संभ्रम

## मृत आई-वडील, आजी-आजोबा असलेल्या मतदारांचे व्हेरिफिकेशन न झाल्याने नाराजी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तहसील प्रशासनाच्या आदेशानुसार सध्या जिल्ह्यासह अंबाजोगाई तालुक्यात आणि तालुक्यातील ग्रामीण भागात मतदार यादी पडताळणी (व्हेरिफिकेशन) मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेद्वारे मतदारांची माहिती तपासून नोंदी अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे. मात्र व्हेरिफिकेशन प्रक्रियेदरम्यान काही ठिकाणी अडचणी निर्माण होत असल्याने मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पडताळणी करताना ज्या मतदारांचे आई-वडील किंवा आजी-आजोबा हयात आहेत, अशा मतदारांचे जुने मतदान ओळखपत्र सहजपणे व्हेरिफिकेशन केले जात असल्याचे सांगितले जात आहे. परंतु ज्या मतदारांचे आई-वडील किंवा आजी-आजोबा हयात नाहीत आणि त्यांचे निधन झाले आहे, अशा मतदारांचे व्हेरिफिकेशन होत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

यामुळे अनेक मतदारांना आपल्या नावाची नोंद मतदार यादीत राहील की नाही, याबाबत शंका निर्माण झाली आहे. काही ठिकाणी संबंधित कर्मचाऱ्यांकडून योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने नागरिकांमध्ये संभ्रम वाढत असल्याचेही सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर सर्व मतदारांचे समान पद्धतीने आणि कोणताही भेदभाव न करता व्हेरिफिकेशन करण्यात यावे, तसेच नियम स्पष्ट करून प्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणी मतदार बांधवांकडून करण्यात येत आहे. तहसील प्रशासनाने याबाबत स्पष्ट सूचना देऊन नागरिकांचा संभ्रम दूर करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांना रोटरी क्लब ऑफ बीडचा 'चंपावतीरत्न' पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने देण्यात येणारा मानाचा चंपावतीरत्न पुरस्कार यंदा राज्याचे माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांना देण्यात येणार आहे दि २२ मार्च रोजी हॉटेल निलकमल मध्ये



ग्लोबल विकास ट्रस्टचे मॅनेजिंग ट्रस्टी मयंक गांधी आणि रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे गव्हर्नर रो सुधीर लातुरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येईल याप्रसंगी रोटरीचे डिस्ट्रिक्ट लर्निंग फ़ेसीलेटर रो ओम मोतीपवळे रोटरी माजी गव्हर्नर रो हरीश मोटवाणी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

बीड शहराच्या शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गणमान्य व्यक्तींना हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो यापूर्वी हा पुरस्कार अभिनेते मकरंद अनासपुरे, स्व केशरबाई पान ३ वर

# पोलिस भरतीत मृत्यूमुखी पडलेल्या तरुणाच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत

बीड । प्रतिनिधी

बीड येथे झालेल्या पोलिस भरती प्रक्रियेदरम्यान मृत्यूमुखी पडलेल्या दीपक भास्कर वाव्हळे (रा. मांडेखेल, ता. परळी वैजनाथ, जि. बीड) यांच्या कुटुंबीयांना बीड येथील महामानव अभिवादन ग्रुपच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली.

या घटनेनंतर दीपक वाव्हळे यांच्या कुटुंबीयांना आधार देण्यासाठी महामानव अभिवादन ग्रुप, बीड यांनी आर्थिक मदतीचे आवाहन केले होते. या आवाहनाला समाजातील नागरिकांनी प्रतिसाद देत एकूण २६,६०० रुपये इतकी रक्कम जमा झाली.ही रक्कम ग्रुपच्या



पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मांडेखेल येथे जाऊन वाव्हळे कुटुंबीयांची भेट घेत सांत्वनपर भेटीद्वारे दीपक यांच्या आई-वडील व भावाकडे सुपूर्द केली. यावेळी कुटुंबीयांचे दुःख हलके करण्याचा प्रयत्न करत सर्वांनी त्यांना धीर दिला.समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन दाखवलेली ही मदतीची भावना ही सामाजिक एकतेचे व माणुसकीचे उदाहरण असल्याचेही यावेळी उपस्थितांनी सांगितले.

# माजी सभापती सुधाकर मिसाळ यांच्या तक्रारीची दखल

## खोकरमोहा सरपंच श्रीहरी मिसाळ यांच्यावर अपात्रतेची कारवाई; ८५ लाखाचा अपहार केल्याचे उघडकीस

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील खोकरमोहा येथील गैरव्यवहार प्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली होती. या प्रकरणी माजी सभापती सुधाकर मिसाळ यांच्या तक्रारीची दखल विभागीय आयुक्तांनी घेत चौकशीअंती ८५ लाखाचा अपहार केल्याचे उघडकीस आला आहे. परीणामी खोकरमोहा सरपंच श्रीहरी मिसाळ यांच्यावर अपात्रतेची कारवाई तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी प्रकरणातील अपहारित रक्कम संबंधितांकडून व्याजासह वसुल करुन शासनखाती भरणा करण्याची कार्यवाही करावी. तसेच सर्व संबंधितांना सदरील आदेशाची प्रत कळवून प्रकरण या न्यायालयात बंद करण्यात येते व संचिका अभिलेख कक्षात वर्ग करावी असे आदेश छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त, जितेंद्र पापळकर (भा.प्र.से ) यांनी दिले आहेत.

विभागीय आयुक्त, जितेंद्र पापळकर यांनी दिलेल्या आदेशानुसार अर्जदार श्री. सुधाकर विठ्ठलराव मिसाळ रा. खोकरमोहा ता. शिरुर कासार जि.बीड यांचा अपील अर्ज दिनांक २१/०३/२०२४ मंजुर करण्यात येतो. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचा फेरचौकशी अहवाल जाक्र साप्रवि-७/पं-चौ/कावि/०००५४/२०२५ दिनांक ०६/०१/२०२६ मान्य करण्यात येतो.

प्रस्तुत प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांचे पत्र दिनांक ०५/१२/२०२४ अन्वये गैरअर्जदार सरपंच श्रीहरी अर्जुनराव मिसाळ, ग्रामपंचायत खोकरमोहा ता. शिरुर कासार जि.बीड व तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांनी संगनमत करुन शासनाची फसवणुक करुन अपहार केल्याने त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन शिरुर येथे प्रथम खबर अहवाल क्रमांक ०२१७/२०२४ अन्वये भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३४,४०९ व ४२० अन्वये फौजदारी गुन्हा नोंद केला आहे त्याअर्थी सरपंच यांनी गैरवर्तणूक केल्याचे दिसून येते, त्यामुळे गैरअर्जदार सरपंच श्रीहरी अर्जुनराव मिसाळ, ग्रामपंचायत खोकरमोहा ता. शिरुर कासार जि.बीड ग्रामपंचायतीच्या सरपंचपदावरुन सांप्रत कालावधीसाठी अपात्र घोषित करण्यात येत आहे,असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# नगरसेविका मनीषाताई गिराम यांच्या पाठपुराव्यामुळे मुख्याधिकाऱ्यांकडून प्रभागाची पाहणी

बीड । प्रतिनिधी

शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील विविध भागांमध्ये रस्ते व नाल्यांची अवस्था अत्यंत बिकट झाल्याची बाब लक्षात घेऊन प्रभाग क्रमांक ८ च्या नगरसेविका मनीषाताई उल्हास गिराम यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांचे लक्ष निवेदनाद्वारे वेधले होते.

त्या निवेदनाच्या अनुषंगाने मुख्याधिकारी शशैलेश फडसे यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या समवेत प्रभाग क्रमांक ८ मध्ये प्रत्यक्ष भेट देऊन परिसराची पाहणी केली.यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशन, भाजी मंडई ते नेहरूनगर या परिसरातील



नाल्यांची स्वच्छता करणे, तसेच पोलीस स्टेशनजवळील नाल्याशेजारी असलेल्या नगरपरिषदेच्या मालकीच्या कोंडवाडयाची जागेची स्वच्छता करण्याबाबत स्वच्छता निरीक्षक यांना तात्काळ आदेश देण्यात आले.

सिटी पोलीस स्टेशन परिसरातील नागरिकांनी कचऱ्याची घंटागाडी वेळेवर येत नसल्याची तक्रार केली. यावर पुढील काळात घंटागाडी नियमित व वेळेवर येईल, अशी ग्वाही देण्यात आली.यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी प्रभाग क्रमांक ८ च्या विकासासाठी आपण वचनबद्ध असल्याचे सांगितले. तसेच नागरिकांनी त्यांच्या अडचणी व समस्या कधीही कळवाव्यात,असे आवाहन केले.मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी सांगितले की, प्रभाग क्रमांक ८ हा शहराच्या मध्यवस्तीत असलेला महत्त्वाचा व्यापारी परिसर असून येथील विविध विकास कामांकडे वैयक्तिक लक्ष देऊन ती पूर्णत्वास नेण्यात येतील.यावेळी शेषेराव तांबे,अशपाक मुन्ना भाई, जगताप सुनील , बाळासाहेब जाधव ,गोरे साहेब,नितीन राजपूत,सनी बुंदेले, नवनाथ प्रभाळे, सतीशसिंह परदेशी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# बीड सांगवी येथे जागतिक महिला दिनानिमित्त महिला मेळाव्याचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेड व तानुबाई बिरजे पत्रकार परिषद जागतिक महिला दिनानिमित्त महिला मेळाव्याचे आयोजन व जिजाऊ माँ साहेब आदर्श पुरस्कार वितरण सोहळा बीड सांगवी ता आष्टी रविवारी दि १५ मार्च रोजी सायंकाळी ५/वा हा मेळावा पार पाडणार होणार साजरा भव्य दिव्य सोहळा उपस्थित रहावे असे आवाहन विनंती शिवमती आशा मनोहर करांडे यांनी केले आहे.



जिजाऊ माँ साहेब आदर्श पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महानंद दूध संघाचे संचालका शिवमती प्राजक्ता ताई सुरेश धस राहणार आहेत तसेच या मेळाव्यात पुणे येथील प्रेरणादायी व्याख्याते शिवमती तेजश्री मुळे.जिजाऊ ब्रिगेडचे उपाध्यक्ष शिवमती वर्षाताई माने.आष्टी तहसीलदार वैशाली पाटील.महिला बाल विकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर.तसेच एडवोकेट कांतीलाल गव्हाणे.याचे मोलाचे मार्गदर्शन लाभणार आहे तसेच विभागीय उपाध्यक्ष शिवमती सुवर्णा गिरे.बीड जिल्हाध्यक्ष संगिता ताई शिंदे.मराठ सेवा संघाचे तालुकाध्यक्ष इंजिनिअर तानाजी पान ३ वर

## पारनेर ग्रामपंचायतीतील विकासकामांबाबत प्रश्नचिन्ह

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पारनेर ग्रामपंचायत अंतर्गत खरोखर विकासकामे झाली आहेत का, असा सवाल सध्या सामान्य नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे. गावातील विविध कामांबाबत माहिती मिळावी यासाठी माहिती अधिकार कायदा २००५ अंतर्गत अर्ज करूनही संबंधित माहिती वेळेत उपलब्ध होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

पारनेर येथील अनिलकुमार मारोती क्षीरसागर यांनी ऑनलाईन पद्धतीने माहिती अधिकार कायद्यान्वये अर्ज करून ग्रामपंचायतीतील विकासकामांची माहिती मागितली होती. सदर अर्ज क्रमांक //२०२६/६००२१ दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी दाखल करण्यात आला होता. याबाबत विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथून संबंधित अर्ज ग्रामपंचायत कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आल्याचे पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. मात्र अद्यापही मागविलेली माहिती पूर्णपणे मिळालेली नसल्याची तक्रार संबंधितांनी केली आहे. ग्रामपंचायत स्तरावर विकासकामांबाबत पारदर्शकता असावी व नागरिकांना माहिती सहज उपलब्ध व्हावी अशी अपेक्षा असताना पान ३ वर

# आष्टी तहसीलदारांचे आवाहन: दिव्यांग लाभार्थ्यांनी ३१ मार्चपर्यंत यूडीआयडी कार्ड जमा करणे बंधनकारक

आष्टी । प्रतिनिधी

सामाजिक सुरक्षा योजनेतंर्गत विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या आष्टी तालुक्यातील दिव्यांग लाभार्थ्यांसाठी तहसीलदार वैशाली पाटील यांनी एक महत्त्वाची सूचना जारी केली आहे. शासनाच्या नियमानुसार, आता संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजनेच्या लाभार्थ्यांसाठी यूडीआयडी कार्ड बंधनकारक करण्यात आले आहे.

तहसील कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यात या योजनांचे एकूण १,६७४ दिव्यांग लाभार्थी आहेत. मात्र, त्यापैकी केवळ ३३१ लाभार्थ्यांनीच आतापर्यंत आपली कार्डे कार्यालयात जमा केली आहेत. उर्वरित १,३४३ लाभार्थ्यांनी अद्याप ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. जे लाभार्थी विहित मुदतीत कागदपत्रे जमा करणार नाहीत, त्यांचे मासिक अनुदान थांबवले जाण्याची शक्यता आहे. तहसीलदार पाटील यांनी स्पष्ट केले आहे की:

''ज्या लाभार्थ्यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत आपली कार्डे जमा केली नाहीत, त्यांना यापुढील योजनांचे लाभ दिले जाणार नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांनी तातडीने ही प्रक्रिया पूर्ण करावी. लाभार्थ्यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांकडून मिळालेले कार्ड (आधार कार्डशी संलग्न केलेले). ऑनलाइन दिव्यांग प्रमाणपत्र, आधार कार्ड प्रत, चालू मोबाईल क्रमांकासह कागदपत्रांच्या छायांकित प्रती तहसील कार्यालय (संजय गांधी योजना विभाग), आष्टी येथे जमा कराव्यात. ही प्रक्रिया लाभार्थ्यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत करून घ्यावी. तालुक्यातील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी या आवाहनाची गंभीर दखल घेऊन आपले अनुदान सुरळीत ठेवण्यासाठी वेळेत कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पाल्यावर अपेक्षांचे ओझे न टाकता त्यांच्यातील कला गुणांना वाव द्या - देविदास धस

आष्टी । प्रतिनिधी

निवृत्तीराव धस महाविद्यालयाचा विद्यार्थी निखिल काशीबा तांबे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परीक्षेत यश मिळविल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य व संस्थेचे अध्यक्ष देविदास धस होते.

यावेळी बोलताना देविदास धस यांनी निखिल तांबे यांचे अभिनंदन करत सांगितले की, जुन्या आणि सध्याच्या शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल झाले असून विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा उपलब्ध होत आहेत. मात्र पालकांच्या अपेक्षांचे ओझे वाढल्याने विद्यार्थी शालेय जीवनातच तणावग्रस्त दिसत आहेत. त्यामुळे पालकांनी विद्यार्थ्यांवर नको त्या वयात अपेक्षांचे ओझे न ठेवता त्यांच्या सुप्त गुणांना वाव द्यावा. कला, क्रीडा, संस्कृती अशा विविध क्षेत्रांत विद्यार्थी आपले कौशल्य दाखवून उज्वल भविष्य घडवू शकतात, असे त्यांनी



प्रतिपादन केले. सत्काराला उत्तर देताना निखिल काशीबा तांबे म्हणाले की, ध्येय आणि चिकाटी असेल तर यश हमखास मिळते. ग्रामीण भागातून येऊनही सातत्यपूर्ण अभ्यास, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते. सूर्यासारखे चमकण्यापूर्वी सूर्यासारखे तळपावे लागते. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारण्याची सवय ठेवावी, मेहनत घ्यावी आणि शिक्षकांप्रती आदर राखावा, असे त्यांनी सांगितले. यावेळी प्राचार्य सूर्यकांत मोकाशे, काशीबा तांबे, संगीता तांबे, म्हस्कुणाथ तांबे, अरणगावचे सरपंच लहू शिंदे, बाळासाहेब तांबे, महादेव तांबे, अजिंक्य तांबे, श्री. सोनवणे, फारूक सय्यद, सुखदेव सोनटक्के, शिवाजी देशमुख, अविशांत कुमकर, सचिन रानडे, अंकुश हुंदाडे, राजू कारंडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुधीर पवार यांनी केले, प्रास्ताविक मुख्याध्यापक विष्णू अदनाक यांनी केले तर आभार श्रीमती बचाटे यांनी मानले.

# मतदारांनी २००२ च्या यादीशी लिंक प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी

## मतदान प्रक्रिया सुलभ करण्यासाठी बीएलओ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन, सभापती निजाम शेख यांची नागरिकांना सूचना

बीड । प्रतिनिधी

मतदार यादी अचूक आणि अद्ययावत राहावी तसेच आगामी निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या वतीने मतदारांची माहिती २००२ मधील मतदार यादीशी लिंक करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व मतदारांनी आपल्या प्रभागातील बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) यांच्याशी तात्काळ संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन नगरपरिषदेचे सभापती निजाम शेख यांनी केले आहे.

मतदार यादीतील माहिती योग्य व अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे. अनेकदा मतदार यादीत पत्ता बदल, नावातील चुका किंवा प्रभागातील बदल यामुळे मतदानाच्या वेळी मतदारांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे अशा अडचणी टाळण्यासाठी नागरिकांनी स्वतः पुढाकार घेऊन मतदार यादीतील माहिती तपासून घ्यावी आणि आवश्यक असल्यास त्यामध्ये दुरुस्ती करून घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.प्रशासनाच्या वतीने सध्या मतदार यादी अद्ययावत करण्याचे तसेच मतदारांचे मॅपिंग करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे शहरातील सर्व नागरिकांनी आपल्या परिसरातील बीएलओ यांची भेट घेऊन मतदार यादीतील नाव, पत्ता व इतर माहिती योग्य आहे का याची खात्री करून घ्यावी. आवश्यक कागदपत्रांसह मॅपिंग प्रक्रिया पूर्ण केल्यास भविष्यात मतदानाच्या वेळी कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, असेही सभापती निजाम शेख यांनी नमूद केले.



विशेषतः ज्या नागरिकांची नावे २००२ मधील मतदार यादीत नोंद होती त्यांनी आपली माहिती तपासणे आवश्यक आहे. विवाहित महिलांनी आपल्या आई-वडील किंवा आजी-आजोबा यांच्या मतदार यादीतील भाग क्रमांक व अनुक्रमांक शोधणे गरजेचे आहे. यामुळे माहिती पडताळणी प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.

नागरिकांना मतदार यादीतील माहिती पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# रांगा लावू नका; पुण्यातील गॅस तुटवड्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर आणि जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून घरगुती व व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची मोठी टंचाई निर्माण झाल्याची चर्चा सुरू होती. मात्र, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी या सर्व चर्चा अफवा असल्याचे सांगत जिल्ह्यात गॅसचा (ङझऋ ऋी डर्हीीरसश) मुबलक साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट केले आहे. वितरणात सुसूत्रता आणण्यासाठी प्रशासनाने आता गॅस पुरवठ्याचा प्राधान्यक्रम निश्चित केला असून, अत्यावश्यक सेवांना कोणताही अडथळा येणार नाही याची खबरदारी घेतली आहे.(ङझऋ ऋी डर्हीीरसश)



जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी सांगितले की, पुणेकरांना सांगू इच्छितो की, घरगुती गॅस उपलब्ध आहे म्हणून व्यवसायिक गॅसवर बंदी आणली आहे. रांगा लावू नका लोकांना आवाहन आहे. गॅस तुटवडा होणार नाही. आपल्याकडे नेहमी गॅस येत असतो. पुरेसा गॅस आहे, २५ दिवसात एक गॅस मिळतो. आपल्याकडे हॉस्पिटलला गॅस कमी पडणार नाही, हॉस्टेलला ही गॅस कमी पडणार नाही. ब्लॅक मार्केट बाबत पथके तयार केली आहेत, जास्त दराने काही ठिकाणी गॅस दिला जातो त्यावर कारवाई केली आहे. गॅस जास्त दराने दिला तर निलंबन कारवाई केली जाईल, वितरक परवानावर ही कारवाई केली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली आहे. ब्लॅक मार्केटबाबत तीन चार कारवाई करण्यात आल्या आहेत.ब्लॅक गॅस देताना कोणी सापडले त .गुन्हे दाखल केले जातील, गॅस जप्त केला जाईल, प्रसंगी गॅस वितरकाचा परवाना रद्द केला जाईल. काही गॅस वितरकांना पोलिस बंदोबस्त दिला आहे त्यांनी मागणी केली होती, काही ठिकाणी लोक पॅनिक होत आहेत, गर्दी करत आहे तर कृपया गर्दी करू नका, गॅस दिला जाईल. उद्योगावर परिणाम झाला आहे.लवकर तो ही संपेल. प्रॉडक्ट बनवले जातात त्यावर परिणाम झाला आहे. उद्योग बंद झाले नाहीत, पण परिणाम झाला आहे. चुकीचे मेसेज पोस्ट टाकू नये, परिस्थिती पॅनिक करू नये, पोलिस कारवाई करतीलच पण असे पोस्ट मेसेज करू नये, असंही त्यांनी सांगितलं आहे.

जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील प्रमुख तेल कंपन्या आणि वितरकांकडे घरगुती वापराच्या सिलिंडरचा पुरेसा साठा असून नागरिकांना त्याचे वितरण नियमितपणे केले जात आहे. असे असूनही गॅस मिळत नसल्याच्या तक्रारी आणि अफवा पसरत असल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, रुग्णालय, आरोग्य संस्था, आपत्कालीन सेवा आणि विद्यार्थ्यांची शासकीय वसतिगृहे यांना गॅस सिलिंडरचा पुरवठा प्राधान्याने करण्याचे आदेश सर्व वितरकांना देण्यात आले आहेत. विशेषतः पुण्यातील हॉटेल आणि खानावळींवर परिणाम झाल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासन विशेष लक्ष देत आहे.जर एखादा वितरक जाणूनबुजून कृत्रिम टंचाई निर्माण करत असेल किंवा गॅस सिलिंडरची चढ्या दराने विक्री करत असेल, तर त्याच्यावर 'अत्यावश्यक वस्तू कायद्या'नुसार कडक कारवाई करण्याचा इशारा जिल्हाधिकारी डुडी यांनी दिला आहे. नागरिकांनी कोणत्याही चुकीच्या संदेशांना बळी पडू नये आणि घरामध्ये गॅसचा अनावश्यक साठा करून ठेवू नये, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे. गॅस पुरवठ्याबाबत काही तक्रार किंवा शंका असल्यास नागरिकांनी संबंधित गॅस वितरक किंवा जिल्हा पुरवठा विभागाशी थेट संपर्क साधावा, असेही यावेळी सांगण्यात आले.

## नवले पुलावर भीषण अपघात; भरधाव ट्रकची ६ वाहनांना धडक, दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कात्रज-नवले पूल पुन्हा एकदा भीषण अपघातामुळे चर्चेत आला आहे. आज सकाळी या भागात झालेल्या अपघातामुळे परिसरातील नागरिक आणि वाहन चालक हादरले. सिग्नलवर थांबलेल्या वाहनांवर भरधाव ट्रक आदळल्याने एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला, तर अनेक वाहनांचे नुकसान झाले. सकाळी सुमारे साडेसहा वाजण्याच्या सुमारास नवले पुलाखालील चौकात नेहमीप्रमाणे वाहनांची वर्दळ सुरू होती. सिग्नल लाल असल्यामुळे अनेक दुचाकी आणि चारचाकी वाहने सिग्नल सुटण्याची वाट पाहत थांबली होती. त्याच वेळी कात्रज बोगद्याच्या दिशेने उतारावरून वेगाने येणाऱ्या एका ट्रकवरील चालकाचे नियंत्रण सुटले. वेग आणि उतारामुळे ट्रक थेट सिग्नलवर उभ्या असलेल्या वाहनांवर आदळला.



सर्वप्रथम ट्रकने एका दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेचा जोर इतका मोठा होता की दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आणि त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्यानंतर ट्रकने समोर उभ्या असलेल्या चारचाकी वाहनांना एकामागोमाग धडक दिली. या धडकेत किमान पाच कारचे मोठे नुकसान झाले. अपघातानंतर काही वेळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. रस्त्यावर वाहनांचे तुकडे पसरले होते आणि अपघात पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली होती. यामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली.

# सिग्नलवर धडकाचा बहाणा करून मोबाईल चोरी करणारी 'टक-टक' टोळी जेरबंद !

**पुणे । प्रतिनिधी**

सिग्नल किंवा गर्दीच्या ठिकाणी चारचाकी वाहनांना धडक लागल्याचा बहाणा करून चालकांचे लक्ष विचलित करत गाडीतून मोबाईल व इतर वस्तू चोरणाऱ्या परराज्यीय 'टक-टक' टोळीचा गुन्हे शाखा युनिट-१ ने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी रवी ओमप्रकाश कोहली (वय ३८) व अफजल कय्युम अब्बासी ( ३८, दोघेही रा. मेरठ, उत्तर प्रदेश) यांना अटक करण्यात आली आहे.



फरासखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून या गुन्ह्याचा तपास करताना गुन्हे शाखा युनिट-१ कडील पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. त्यावेळी दोन संशयित इसमांचा शोध सुरू असताना पोलीस अंमलदार मयूर भोसले, अमित जमदाडे व हेमंत पेरणे यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, संशयित समर्थ पोलीस ठाणे हद्दीतील एका लॉजमध्ये येणार आहेत. ही माहिती मिळताच पोलीस निरीक्षक अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने लॉज परिसरात सापळा रचला. मिळालेल्या वर्णनानुसार दोन इसम तेथे येताच त्यांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीत त्यांनी फरासखाना परिसरातील गुन्ह्यासह पुणे शहरातील आणखी गुन्हे केल्याची कबुली दिली.

तपासात आरोपींनी अलंकार पोलीस ठाणे हद्दीत ११ फेब्रुवारी २०२६ रोजी कर्वे रोडवरील सारस्वत बँकेसमोर उभ्या असलेल्या कारमधून भगव्या रंगाचा ॲपल आयफोन-१७ प्रो व पांढऱ्या रंगाचे पॉकेट चोरी केल्याची कबुली दिली. या प्रकरणी अलंकार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याचे समोर आले. तसेच १९ ऑगस्ट २०२५ रोजी विमाननगर चौकात स्विफ्ट कार चालकाला गाडी पायावरून गेल्याचा बहाणा करून गाडीतून सॅमसंग व वनप्लस कंपनीचे मोबाईल चोरी केल्याचेही त्यांनी कबूल केले. या घटनेबाबत विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद आहे.

पुणे शहरातील फरासखाना, अलंकार व विमानतळ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गुन्हे केल्याची कबुली आरोपींनी दिल्यानंतर त्यांना पुढील कारवाईसाठी फरासखाना पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त (गुन्हे) निखील पिंगळे व सहायक पोलीस आयुक्त शैलेश संखे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक अजित जाधव, पोलीस अंमलदार मयूर भोसले, अमित जमदाडे, हेमंत पेरणे, अनिकेत बाबर, निलेश साबळे, शशिकांत दरेकर, संदेश काकडे, महिला पोलीस अंमलदार ज्योती मुल्का व चालक पोलीस अंमलदार प्रफुल शेलार यांनी सहभाग घेतला.

# वाहतूक पोलिसांनो दादागिरी करू नका! अपर पोलीस महासंचालकांचे निर्देश; सक्तीच्या दंड वसुलीला चाप

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील रस्ते वाहतूक पोलिसांच्या वर्तणुकीबाबत आणि दंड वसुलीच्या पद्धतीबाबत अनेक तक्रारी समोर येत असतानाच, वाहतूक विभागाचे अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांनी संपूर्ण राज्यभरातील ट्रॅफिक पोलिसांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यापुढे वाहनचालकांना अडवल्यानंतर त्यांच्याशी अत्यंत सौजन्याने आणि आदराने वागण्याचे आदेश देण्यात आले असून, दंड वसुलीसाठी कोणतीही अनावश्यक सक्ती करू नये, असे स्पष्ट केले आहे.

दरम्यान, बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध करण्यात येणाऱ्या कारवाईनंतर अनेक वाहनचालकांनी दंडाची रक्कम भरली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे थकीत वसुली करण्यासाठी पुणे वाहतूक पोलिसांनी २६ फेब्रुवारी विशेष मोहीम हाती घेतली आहे. शहरातील वाहनचालकांकडून तब्बल ४०० कोटी दंड बाकी आहे. त्यामुळे या मोहिमेचे काय होणार, हा प्रश्न पडला आहे.

अप्पर पोलीस महासंचालकांनी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे, की वाहतूक पोलिसांचे मुख्य काम हे रस्ते सुरक्षा आणि वाहतूक सुरळीत करणे आहे; केवळ दंड वसुली करणे नव्हे. अनेकदा पोलीस कर्मचाऱ्यांकडून



वाहनचालकांशी अरेरावी केली जाते किंवा वसुलीसाठी दबाव टाकला जातो. ज्यामुळे पोलिसांच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम होतो. हे टाळण्यासाठी प्रत्येक पोलीस कर्मचाऱ्याने कर्तव्यावर असताना संयम पाळावा. वाहनचालकांना वाद घालून अपमानास्पद वागणूक देऊ नये, असेही निर्देश दिले आहेत. नियमांचे उल्लंघन झाल्यास कायद्यानुसार दंड आकारा. मात्र, कारवाई करताना शिस्त आणि सौजन्य राखणे आवश्यक असल्याचेही नमूद केले आहे. प्रलंबित दंड वसुली मोहिमेदरम्यान वाहनचालकांना त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**पुणेकरांनी भरला सहा कोटी दंड**

बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध करण्यात येणाऱ्या कारवाईनंतर अनेक वाहनचालक दंडाची रक्कम भरत नसल्याचे समोर आले आहे. एकट्या पुणे शहरात तब्बल ४०० कोटीचा दंड थकीत आहे. त्यामुळे थकीत दंडाची वसुली करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. वाहनचालकांनी येत्या ३० दिवसांत थकीत दंड न भरल्यास वाहन परवाना रद्द करण्याचा प्रस्ताव प्रादेशिक परिवहन विभागाकडे (आरटीओ) सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही मोहिम २६ फेब्रुवारी रोजी सुरू झाली. त्यानंतर अवघ्या १४ दिवसांत पुणेकरांनी सहा कोटी रुपये दंड भरला आहे.

# वाघोलीच्या पाणीपुरवठा योजनेचा २२ मार्चला लोकार्पण सोहळा; ७ वर्षे रखडलेले काम अखेर पूर्ण

**पुणे । प्रतिनिधी**

वाघोली गावासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणारी पीएमआरडीए ची वाढीव पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास आली असून या योजनेचे लोकार्पण लवकरच करण्यात येणार आहे. या योजनेमुळे वाघोली परिसरातील नागरिकांना दररोज सुमारे ५० लाख लिटर पाणी उपलब्ध होणार आहे. सध्या वाघोली परिसरातील अनेक नागरिकांना पाणी विकत घ्यावे लागत आहे. मात्र ही योजना सुरू झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात विकत पाण्यावरील अवलंबित्व कमी होणार असून नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळणार आहे. तसेच सोसायटीमध्ये राहणाऱ्या नागरिकांचा मेंटेनन्स खर्चही कमी होण्यास मदत होणार आहे.



या योजनेला स्व. आमदार बाबुराव पाचर्णे यांच्या प्रयत्नातून २०१९ साली सुमारे २३ कोटी रुपयांची मंजुरी मिळाली होती आणि त्यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले होते. मात्र विविध कारणांमुळे मागील सात वर्षांपासून या पाणीपुरवठा योजनेचे काम रखडले होते.

दरम्यान, नगरसेविका रत्नमाला संदिप सातव आणि भाजप जिल्हा सरचिटणीस संदिप आबा सातव यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा करत संबंधित अधिकारी, जागामालक आणि ठेकेदार यांच्यासोबत समन्वय साधत विविध अडचणी दूर केल्या. तसेच वेळोवेळी कामाची पाहणी करून काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावे यासाठी विशेष प्रयत्न केले.

या प्रयत्नांमुळे अखेर ही योजना पूर्णत्वास आली असून वाघोलीला पाणीदार करणाऱ्या या महत्त्वाच्या प्रकल्पाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते येत्या २२ मार्च २०२६ होणार आहे.

## मुळशीत गॅस सिलिंडर टंचाई; एजन्सीसमोर नागरिकांच्या लांबच लांब रांगा

**मुळशी । प्रतिनिधी**

ऑनलाइन किंवा फोनवरून बुकिंग करूनही घरगुती गॅस सिलिंडर मिळत नसल्याने मुळशी तालुक्यात विविध गॅसवितरकांच्या दुकानांसमोर नागरिकांनी रांगा लावल्याचे चित्र दिसून येत आहे. युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता घरगुती गॅसपुरवठ्यावरही जाणवू लागला आहे. एलपीजीच्या टंचाईवर मात करण्यासाठी सरकारने उद्योग आणि हॉटेल क्षेत्रातील गॅस सिलिंडरच्या वापरावर मर्यादा आणून घरगुती ग्राहकांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, अचानक वाढलेल्या मागणीमुळे मुळशी तालुक्यातील विविध गॅसवितरण केंद्रांसमोर बुधवारी (दि. ११) व गुरुवारी (दि. १२) नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. काही ठिकाणी ग्राहक आणि वितरक यांच्यात शाब्दिक वाद झाल्याच्या घटनाही घडल्या.

वितरकांकडून पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे सांगितले जात असले, तरी भीतीपोटी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात बुकिंग केल्यामुळे घरगुती गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्याची परिस्थिती आहे. ऑनलाइन किंवा फोनवरून बुकिंग करूनही सिलिंडर मिळत नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजी व्यक्त होत आहे. सध्याच्या उपलब्ध साठ्यानुसार बुकिंग केल्यानंतर सिलिंडर मिळण्यासाठी किमान ३० दिवस प्रतीक्षा करावी लागू शकते, अशी माहिती वितरकांकडून देण्यात आली.


**तहसीलदारांकडून तपासणी**

गॅस सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी तसेच नागरिकांना वेळेवर सिलिंडर उपलब्ध व्हावा, यासाठी मुळशी तहसील कार्यालय व पुरवठा विभाग सतर्क झाला आहे.

# मांजर अन् पोपटावरून वाद; शेजारी आपापसात भिडले, प्रकरण थेट पोलीस ठाण्यात

**पुणे । प्रतिनिधी**

मांजर आणि पोपट यांचा वाद आपण अनेक गोष्टींमध्ये ऐकतो. मात्र अशीच एक घटना पुण्यात प्रत्यक्षात घडली असून या वादाची नोंद थेट पोलीस (झेश्रळलश) ठाण्यापर्यंत पोहोचली आहे. शहरातील ताडीवाला रोड परिसरात मांजर आणि पोपटाच्या कारणावरून दोन शेजाऱ्यांमध्ये वाद निर्माण झाला आणि त्याचे रूपांतर तुफान मारामारीत झाले. या प्रकरणी मांजरीचा मालक दिनेश रंगराव पोताबत्तोनी याच्याविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अभिषेक सिंग हे ताडीवाला रोड परिसरात कुटुंबासह राहतात. त्यांनी आपल्या घरात एक पोपट पाळला असून त्याचा पिंजरा घरासमोर ठेवलेला असतो. त्यांच्या शेजारी राहणारे दिनेश रंगराव पोताबत्तोनी यांनी मांजर पाळले आहे.

हे मांजर परिसरात मोकळेपणाने फिरत असल्याने ते अनेकदा सिंग यांच्या घरासमोर येऊन पोपटाच्या पिंजऱ्याजवळ फिरत असे. काही वेळा त्या मांजरीने पोपटाचा पिंजरा ढकलल्याच्या घटना घडल्या होत्या. त्यामुळे सिंग यांना याचा त्रास होत होता. त्यांनी याबाबत शेजारी दिनेश पोताबत्तोनी यांना मांजरीवर लक्ष ठेवण्याची विनंती केली होती. मात्र याच कारणावरून दोघांमध्ये वारंवार वाद होत होता. घटनेच्या दिवशीही मांजरीने पुन्हा एकदा पोपटाचा पिंजरा पाडल्याने दोघांमध्ये वाद झाला. पिंजरा पडल्यामुळे संतापलेल्या अभिषेक सिंग यांनी दिनेश पोताबत्तोनी यांना मांजरीवर नियंत्रण ठेवण्यास सांगितले. मात्र ही बाब दिनेश यांना न पटल्याने दोघांमध्ये जोरदार वाद सुरू झाला. सुरुवातीला दोघांमध्ये तोंडी वाद झाला. त्यानंतर दोन्ही कुटुंबातील सदस्यही या वादात सहभागी झाले. पाहता पाहता परिस्थिती चिघळली आणि दोन्ही बाजूंचे लोक रस्त्यावर येऊन एकमेकांना शिवीगाळ करू लागले. काही वेळातच या वादाचे रूपांतर धक्काबुक्की आणि मारहाणीत झाले. या मारहाणीत अभिषेक सिंग यांना दुखापत झाली. या घटनेनंतर अभिषेक सिंग यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत दिनेश रंगराव पोताबत्तोनी यांच्याविरोधात गुन्हा नोंदवला असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. मांजर आणि पोपटाच्या कारणावरून शेजाऱ्यांमध्ये एवढा मोठा वाद होऊन मारामारी झाल्याची चर्चा सध्या परिसरात रंगली आहे. पुणे शहरात क्षुल्लक कारणांवरून वाद वाढून मारहाण आणि गुन्हेगारी घटनांचे प्रमाण वाढत असल्याची चिंता नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे.

# पुण्यात काँग्रेसचा एल्गार! गॅस दरवाढीवरून मोदी सरकारवर हल्लाबोल; गॅस टंचाईचा मुद्दा तापला

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात गॅस सिलिंडर विषयक समस्या वाढत असताना याची झळ हाटेल, खानावळ व्यावसायिकांना बसत आहे, व्यावसायिक सिलिंडर पुरवठा बंद करण्यात आलेला असताना शासनाने घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरामध्येही अचानक मोठी वाढ केली आहे तसेच गॅस सिलिंडर नोंदणीचा कालावधी सुद्धा वाढविला आहे. सिलिंडरसाठी मोठी गैरसोय सुरू झालेली असताना नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.




याच मुद्यावर पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शासनाच्या विरोधात स्वारगेट येथे आंदोलन केल्याने विरोधकांमुळे सिलिंडर समस्येचा मुद्द चांगलाच पेटला आहे. अच्छे दिनाचे स्वप्न दाखविणाऱ्या शासनाने मोठ्या प्रमाणात गॅस सिलिंडर दरवाढ करीत जनतेचा विश्र्वासघात केल्याची टीका करीत पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शासनाच्या विरोधात स्वारगेट येथे आंदोलन करण्यात आहे. शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या नेतृत्वाखालील हे आंदोलन करण्यात आले, ते म्हणाले की, महागाईने सर्वसामान्य जनतेचे जगणे आधीच कठीण झाले असताना केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने एलपीजी गॅसच्या किंमती वाढवून लुट सुरू केली आहे. डॉ. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वाखाली युपीए सरकारने आंतरराष्ट्रीय बाजारात गॅसच्या किंमती वाढल्या तरी त्याचा बोजा सामान्य जनतेवर पडू दिला नाही. सबसीडी देऊन जनतेला महागाईचे चटके बसू दिले नाहीत. आताच्या सरकारमुळे मात्र मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. या आंदोलनात माजी आमदार दिप्ती चवधरी, नगरसेवक प्रशांत जगताप, विशाल मलके, अश्विनी लांडगे, दिपाली डोख, सुनिल शिंदे, उपाध्यक्ष अजित दरेकर, प्राची दुधाणे, भरत सुराणा, नुरूद्दीन सोमजी, बाळासाहेब अमराळे, राज अंबिके, द. स. पोळेकर, संदिप मोकाटे, रवि ननावरे, कृष्णा सोनकांबळे, सुरेश चौधरी, युवक अध्यक्ष सौरभ अमराळे, अनुसया गायकवाड, सिमा सावंत, अनिता धिमधिमे, प्रियंका मधाळे, सुंदर ओव्हाळ, ब्लॉक अध्यक्ष रमेश सोनकांबळे, अक्षय माने, संजय मोरे, राकेश नामेकर, रवि पाटोळे, सचिन सावंत, अनिल धिमधिमे, सागर धाडवे, फिरोज शेख आदी सहभागी झाले होते. गॅस दरवाढ कमी करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांना निवेदनही देण्यात आले.

# महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीची मतमोजणी रविवारी

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकांमधील मतमोजणीची प्रक्रिया रविवारी (दि. १५) साहित्य परिषदेतच (टिळक रस्ता) होणार आहे. सकाळी साडेआठ वाजतापासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. मतमोजणीसाठी नियमावली तयार करण्यात आली असून, सायंकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत निकाल लागण्याची शक्यता आहे. मतमोजणीला स्वतः उमेदवार आणि त्यांच्यासोबत फक्त एक प्रतिनिधीची उपस्थिती, उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधीला मोबाईल किंवा कॅमेरा आणण्यास बंदी, कोणत्याही प्रकारचे चित्रीकरण करण्यास बंदी, असे विविध नियम मतमोजणीसाठी करण्यात आल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी ड. प्रताप परदेशी यांनी दिली.

साहित्य परिषदेची निवडणूक २०१६ मध्ये झाली होती. दहा वर्षांनंतर परिषदेच्या निवडणुका होत असून, परिवर्तन उत्कर्ष आघाडी आणि साहित्य संवर्धन आघाडी अशा दोन आघाड्यांमध्ये निवडणुकीत चुरस आहे. राज्यभरात परिषदेचे १६ हजारांहून अधिक सभासद आहेत. परिषदेचे इतर




जिल्हा प्रतिनिधी बिनविरोध निवडून आल्याने परिषदेचे अध्यक्ष, प्रमुख कार्यवाह आणि कोषाध्यक्ष या तीन पदांसह पुणे जिल्हा आणि शहर कार्यवाहपदासाठी ही निवडणूक होत आहे. शुक्रवारी (दि. १३) टपालाने मतपत्रिका पाठविण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यानंतर उमेदवारांच्या समक्ष मतपेट्या सील केल्या जाणार आहेत. मतमोजणी सुरू झाल्यापासून संपेपर्यंत उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधीला मतमोजणीस्थळ सोडता येणार नाही, मतमोजणी प्रक्रियेदरम्यान उमेदवार किंवा त्याच्या प्रतिनिधीने कोणत्याही प्रकारचा गोंधळ किंवा हुज्जत घातल्यास अशा उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींना स्थळ सोडावे लागेल आणि प्रक्रिया त्यासंबंधीची यंत्रणा आणि पद्धत याबाबत निवडणूक मंडळाचा निर्णय अंतिम राहील, असेही नियम करण्यात आल्याचे ड. परदेशी यांनी स्पष्ट केले. मतमोजणीच्या दिवशी पोलिस बंदोबस्त मसापची मतमोजणी रविवारी (दि. १५) होणार असून, निवडणूक मंडळाकडून मतमोजणीची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. मतमोजणीच्या वेळेस कोणताही गोंधळ किंवा अनुचित प्रकार घडू नये, यासाठी निवडणूक मंडळाने पोलिस बंदोबस्त मिळावा, अशा मागणीचा अर्ज पोलिस आयुक्तालयात केला आहे, अशी माहिती ड. परदेशी यांनी दिली.